शब्दांश प्रकाशन

# माझ्यातली ती

## स्त्री विशेषांक 2020



कथा

लेख

कविता

गजल

# अर्पणपत्रिका

*खरं सांगायला गेलं, तर स्त्री हे अनेक युगांचं कोडं राहिलेलं आहे. बघा ना, कुंती आजन्म आपल्या ज्येष्ठ पुत्राच्या आठवणीत अश्रू ढाळत बसली, आणि वेळ आल्यावर पंचपुत्रांच्या सुरक्षिततेचं वरदान मागून त्याच्या भाळी मरणाचा टाक टाकला. त्या परमेश्वराला देखील ह्या कोड्याच रहस्य सोडवण्यासाठी या जन्मात जावंस वाटलं. वेदना काय असतात हे दाखविण्यासाठी दुर्वासाला अंबरीष राजाला गर्भवासाचा शाप द्यावासा वाटला, मात्र जगातल्या प्रत्येक मातेने ते वरदान हसत स्वीकारलं.*

*प्रत्येकाच्या आयुष्याच्या प्रत्येक पावलावर हे कोडं सोबत असतं. कधी मार मार मारणारी पण रात्री बारा वाजता झोपेतून उठून शिरा करणारी आई म्हणून... लग्नाचा वाढदिवस विसरला म्हणून महिनाभर अबोला धरणारी पण आजारपणात महिनाभर उशाशी बसणारी पत्नी म्हणून... शाळेत लवकर घ्यायला आला नाहीस म्हणून धिंगाणा घालणारी पण रात्री दमून पडल्यावर डोळे मोठे करून "दमलास का?" असं विचारणारी मुलगी म्हणून...कॅडबरीच्या प्रत्येक तुकड्यात वाटा असणारी आणि आईबाबाचं घर स्वखुशीने भावाच्या नावावर करू देणारी बहीण म्हणून... एवढंच काय तर व्हॅलेंटाईन डे ला रेड ऐवजी यलो रोज दिलं म्हणून ब्रेक अप पर्यंत जाणारी पण आई बाबांपासून चोरून रात्रभर गप्पा मारणारी गर्लफ्रेंड म्हणून सुद्धा... गोष्टी सांगणारी आजी, भेटल्यावर कडकडून गलगुच्चा घेणारी दूरची काकू, थोडासा राग, जास्त प्रेम करणारी मामी... अनेक रूपे...अनेक कोडी!*

*या कोड्याना समजायचं कसं? कारण ही कोडी "दिल मे आते है, समझ मैं नहीं." आपल्या स्वत्वात प्रत्येकाला सामावून घेणारी, प्रत्येकाच्या स्वत्वात सामावून जाणारी, तिच्या स्वत्वासाठी, तिच्या "ती" पणाला अर्पण हा अंक!!!*

shabdaunsh@gmail.com / facebookalwayson@gmail.com

*{संपादक टिम - मधुरा, सिध्दि, अर्चना, पल्लवी, अजय.}*

*विशेष आभार - स्वप्ना बाळापूरे- मुखपृष्ठ क्रेडिट*
*मनीष विसपुते- अर्पण पत्रिका*
*महेश भोर- सहकार्य*





# अनुक्रमणिका


1) निर्णय - कथा - जयश्री जयंत श्रीखंडे ................{३}

2) स्त्री - शब्दातिल रहस्य - लेख - संजय सत्यदेव चेपे ................{५}

3) देवा - गजल - विशाल ब्रह्मानंद राजगुरु ................{७}

4) कॅन्सर - तिची विजयी लढाई - लेख - मधुरा अभय आगटे ................{८}

5) आता कुठे मला - गजल - संजीवनी तोफखाने ................{१४}

6) रागिणी देसाईचा थरारक प्रतिशोध - लेख - अमृता जोशी ................{१५}

7) आजी - कविता - निरुपमा महाजन ................{१९}

8) मला भावलेली ती - कथा - माधवी देवळाणकर. ................{२०}

9) MARIEKE VERVOORT - लेख - मंदार पत्की ................{२९}

10) तिच्यातली हरवलेली ती - कविता - अरुणा धनंजय विचारे ................{३२}

11) MAINTENANCE - ललित - अर्चना गवस चौधरी ................{३३}

12) नवी सुरूवात - कथा - अजय चव्हाण ................{३५}

13) प्रेताकल्प - कथा - अज्ञातवासी ................{४०}

14) मुलाखत १ - भाग्यश्री कुलकर्णी ................{४६}

15) रखमा - कथा - सिध्दि चव्हाण ................{५१}

16) घुसमट जीवाची - कविता - प्राची प्रकाश देशपांडे ................{५८}

17) अपवादात्मक अपवाद - लेख - चेतन सुभाष गुगळे ................{५९}

# निर्णय

*सौ. जयश्री जयंत श्रीखंडे*

दारावरची बेल वाजली. नकळत घड्याळ पाहिले. ८ वाजले होते. गेली १० वर्ष वेळ पाळत चंदा ८ वाजता येत आहे.

वेळ घड्याळ बंद पडेल, पण चंदा मात्र हजर. दार उघडलं, तशी आत येता येता म्हणाली "ताई राहू दे मी आवरते राहिलेलं. तुम्ही खाऊन घ्या आणि आवरा तुमचं. "असे म्हणून किचन Apron लावून कामालाही लागली. दोघींचे चहाचे कप भरले. एक हातात देत म्हणाली, "घ्या ताई." चहा घेऊन मी आवरून निघाले. "येते ग चंदा दार लावून घे. तुझं झाले की लॅच लावून जा." असे म्हणत मी जीना उतरून खाली नेहमीची रिक्षा उभी होती त्यात बसले. अशी आमची रोजची दिवसाची सुरूवात. रिक्षात बसताच निवांत श्वास घेतला. आणि विचार करू लागले! इतकी सवय झालीयं ना, मला चंदाची की तिच्या शिवाय माझं पानही हलत नाही. सगळं मी तिच्यावर सोपवते आणि निर्धास्तपणे ऑफिसला जाते. कसं काय जमतं बुवा चंदाला! मला आश्चर्यच वाटतं. कारण एकाच वेळी अनेक घरची कामेही ती करते! आणि मी या विचारात बुडून गेले...

चंदा वय अंदाजे ३५ वर्ष, सावळा वर्ण, ५ वी पर्यंत शिक्षण झालेले, साधी स्वच्छ नेटकी साडी. मॅचींग ब्लाऊज, केसांचा एक शेपटा खांद्यावर पर्स, हातात घड्याळ आणि मोबाईल. प्रसन्न, आत्मविश्वासाने भरलेला हसरा चेहरा...

घरी आजारी नवरा. त्याची तोकडी मेडिकल पेन्शन. पदरी २ मुलं म्हणून मोजकीचं घरकामं करते. मुलांना खुप शिकवून मोठं करायचं हेच ध्येय! त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून कधी कधी बरोबर घेऊन येते. सणवार पै पाहुणा सगळे आनंदाने करते...आपण बाहेर पडून करिअर करतो. त्या मधे घरातल्यां प्रमाणे चंदाचाही किती मोठा हात आहे हे सांगता येणार नाही...

चंदा, आलेल्या कठीण परिस्थिती वर मात करताना पैसे मिळवण्याचा कोठेही हव्यास नाही. नवरा मुले यांची काळजी आधी. नियमितपणा, कामांत टापटीप, चपळता. मदत करण्याची इच्छा. त्यामुळे तिच्या विषयी सगळ्यांना आदर आहे. तीला ताई, मावशी असे संबोधले जाते...माझा हात मोडला होता तेव्हा तर ती माझी वेणी घालण्या पासून सगळं करायची. अतिशय प्रेमाने व निरपेक्षपणे. चंदाची वैशिष्ट्य म्हणजे कधीही उसने पैसे मागणं नाही. कारण आपल्या कुवतीप्रमाणे खर्च करण्याची सवय. आजारी नवरा त्याला सरकारी योजनेतून औषध उपचार करते. त्यामुळे कर्ज नाही. उलट पोस्टात बचत करते. मुले ही सरकारी शाळेत शिकतात. हुषारही आहेत. मुख्य म्हणजे त्यांना परिस्थितीची जाणीव आहे. सगळं ठीक चाललंय म्हणून शांत झोप. त्यामुळे आरोग्यही उत्तम. तीची इच्छा पूर्ती व प्रगती नक्कीच आहे. हेच तीचं करिअर असेल... आपण मात्र जास्त पगार, चैनीच्या वस्तू, मोठं घर, स्टेटस् याच्या मागे लागतो. आणि शरीर व मन स्वास्थ्य हरवून बसतो... चंदा कडे पाहिले की वाटते. तीच्या प्रमाणे आपल्याही आई वडिलांनी आपल्याला शिकवलं. योग्य ते दिलं, आपल्यासाठी भरपूर वेळ दिला. आपणही चांगले घडलोच की... आपण मात्र आपल्या कुटुंबाला एक रविवार सोडला तर वेळ देऊ शकत नाही. पै पाहुणे, सणवार याचा आनंद घेऊ शकत नाही...चंदा व आपल्या आई वडील सारखे का नाही आपण पैशापेक्षा कुटुंबाला प्राधान्य देत. तेवढ्यात रिक्षा थांबली. "ताई ऑफिस आलं " असे म्हणताच मी तंद्रीतून जागी झाले...रिक्षातून उतरले पण ठरवलं! या पुढे फक्त पैसे मिळवण्यासाठी नाही. स्वतः साठी, कुटुंबासाठी, आनंदाने भरभरून ताणविरहीत जगायचं. आई बाबा अन चंदासारखं. निर्णयाने मन हलकं झालं आणि हसतमुखानं ऑफिस गाठलं.

# स्त्री-शब्दातिल रहस्य

संजय सत्यदेव चेपे

स्त्री का केवळ शब्दच आहे का ? स्त्री ह्या शब्दात काही रहस्य दडलेलं आहे का ?
ब्रह्म देवाने हि सृष्टी निर्माण केली असे आपाले पुराण सांगते. पण जेव्हा त्यांनी सृष्टी चे निर्माण केले तेव्हा त्यांना काही तरी अपूर्ण आहे, किंबहुना हि श्रुष्टि निरास आहे असा वाटत असे. एकदा ते सचिंत मुर्द्रेत असताना त्यांना एक विचार आला, तो म्हणजे हि सृष्टी चैत्यन्याला जोडण्याचा, व त्यांनी ह्या श्रुष्टीत स्त्री चे निर्मिती केली.

स्त्री म्हणजेच शक्ती...ब्रह्मशक्ती...विष्णुशक्ती...शिवशक्ती... अश्या शक्ती ने श्रुष्टीत एक ऊर्जा आली, एक जिवंतपणा आला आणि वसुंधरेत म्हणजे आपल्या पृथ्वीवर चैत्यन्य अवतरले म्हणजेच स्त्री. वृक्ष, फुलं, फळे, जल ह्याने वसुंधरा बहरली.
स्त्री ह्या शब्दचा बारकाईने अभ्यास केला तर समजून येते कि हा फक्त एक शब्द नव्हे तर ह्या शब्दात एक जोडण्याची प्रक्रिया आहे. ह्या एका शब्दात अनेक  महत्वाचे पैलू व अनेक रहस्य दडलेले आहेत .
आपण सर्व सामान्य लोक आपल्या घराला प्रचंड महत्व देतो, दमून भागून आल्या वर घर हेच आपले आराम घेण्याचे स्थान आहे. ह्याच घराला घरपण देणारी ही एक स्त्रीच असते, आपण तिला गृहलक्ष्मी म्हणतो. स्त्री ला आपण आदिशक्ती मानले आहे म्हणूनच तिला गृहलक्ष्मीचा मान आहे.

पुरातन काळात ह्या आदिशक्तीने अनेक रूपात आपले रक्षण केलेले आढळते. काळानुसार तिचे रूप बदलत असते. एखादी मुलगी एखाद्याची भगिनी असते, तर एखाद्याची पत्नी असते. कालांतराने ती आई चे रूप घेते व नंतर कालौघात  प्रेमळ आजी सुद्धा बनून घराण्याचा उद्धार करते. इतके प्रचंड कार्य ही एक स्त्रीच करत असते आणि सर्वात मोठी बाब म्हणजे हे करत असताना तिची कोणतीही अपेक्षा नसते.

**इ.स पूर्व २५०० हा कालखंड उपनिषदांचा कालखंड म्हणून ओळखला जातो . ह्या कालखंडात सुद्धा आपणास गर्गी, मैत्रयी, लोपामुद्रा इत्यादी विदुषी आढळून येतात कि ज्यांनी समाज रचने मध्ये आपला फार मोलाचा वाटा उचलला होता. दुर्दैवाची बाब अशी कि ह्या विदुषींच चरित्र फार मोठ्या प्रमाणात उपलब्ध नाही.**

**आपला देश 'भारत' ज्याचा नावाने ओळखला जातो तो 'भरत' सुद्धा शकुंतलेच्या पुत्र होता आणि माता हीच त्यांची गुरु होय. श्री दत्तात्रय हे देखील अनुसूया पुत्र म्हणूनच ओळखले जातात. माते ची म्हणजेच स्त्री ची महती ह्यातच दडलेली आहे.**

**प्रचंड मातृ भक्त श्री गणेश, जे माते करिता प्रत्यक्ष शिवांशी लढले अश्या प्रथम पूजनीय श्री गणेश ह्यांना पण गौरी पुत्र म्हणून ओळखतो. जसे शक्ती शिवाय शिव अपूर्ण आहेत, तसेच प्रकृती म्हणजेच स्त्री शिवाय पुरुष अपूर्ण आहे. पूजनीय जिजा माता नसत्या तर छत्रपती शिवाजी महाराज घडलेच नसते, एवढी स्त्री ची महती आहे.**

**एक स्त्री काय काय करू शकते ह्याचे अनेक उद्धरणे देता येतील, पुरतानातले दाखले देण्यात येतील. पण अत्यंत खेदाने म्हणावे लागेल कि आम्ही हि माहिती विसरत चाललो आहोत. भगिनी, माता, आजी अशी अनेक रेशमी नाती आम्हाला पारखी होत आहे, ह्याचा आम्ही विचार करावयास हवा.**

**ह्या परम पूजनीय शब्दाला माझे शतशः वंदन.**




*(मी सुद्धा स्पर्शू शकते आकाश, फक्त संधी मिळायचा अवकाश.)*

# गजल - देवा

*विशाल ब्रह्मानंद राजगुरु*

किती थांबायचे आम्ही तुझ्या दारावरी देवा
न माहेरी कुणी आहे न कोणी सासरी देवा

अरे देवा अरे देवा अरे देवा अरे देवा
करावी आणखी कुठवर रुढींची चाकरी देवा

कशाला जन्म बाईचा दिला आहेस आम्हाला
किती भाजायच्या केवळ चुलीवर भाकरी देवा

जगाने गाठला मंगळ, कुणी चंद्रावरी गेले
नि आम्ही राहिलो मारत मने बंदी घरी देवा

किती स्वप्ने बघितलिस का सडत पडलीत माळावर?
करू मी काय त्यांचे? सांग ना आता तरी देवा

गवसला सूर तर नाही अजुनही जीवनाचा, वर
दिलिस हातात अमुच्या फुंकणीची बासरी देव



*(स्त्री म्हणजे घराचे घरपणं, स्त्री म्हणजे मायेचं दर्पणं, स्त्री घराचा मजबूत आधारस्तंभ, स्त्री म्हणजे प्रेमाने भरलेला कुंभ.)*

# " कॅन्सर- तिची विजयी लढाई "



- सौ.मधुरा अभय आगटे

*शब्दांकन: शब्दांश संपादक समूह*

**Cancer हा शब्द ऐकला की भीती वाट्ते. ज्याला होतो त्याला तर नैराश्याचा झटका येतो म्हणे... म्हणजे त्यानंतर आयुष्य म्हणजे आजन्म भीतीच ... अश्या समजुती असलेल्या मला, माझ्या मैत्रिणीने तिच्या आईला breast कॅन्सर झाल्याचं सांगितलं, क्षणभर जमीन सरकली पायाखालची, कसं होईल, काय होईल ह्या विचाराने.. मला जर असं वाटलं असेल तर मग मैत्रिणीच्या घरात काय झालं असेल. त्यानंतर कळत गेलं काकूंची treatment complete झाली. काकूंनी त्यांचे retirement चे 2 वर्ष पूर्ण केले, मुलाचं लग्न केलं, ट्रिप, get together सगळंच enjoy केलं...म्हटलं अस कसं होऊ शकतं कधीतरी भेटूया बरं काकूंना आणि माझ्यातली 'ती' शोधत मी काकूंना जाऊन भेटली...**
**काकु म्हणजे सौ.मधुरा अभय आगटे, B.com... नावाप्रमाणेच एक मधुर व्यक्तिमत्त्व. काकूंना काय विचारावं? ह्या गोष्टी बद्दल बोलावं की नाही? जुन्या जखमा उकरून तर काढणार नाही ना? असा विचार करत काकूंच्या घरी पोहचलो...आणि काका काकूंनी हसतमुख चेहऱ्याने माझं स्वागत केलं तेव्हाच कळलं, आजची संध्याकाळ अतिशय special ठरणार आहे.**

**कसं आणि काय विचारू काही कळत नसताना काकांनीच मदत केली. "अग, कसं कळलं आपल्याला, काय treatement घेतली ते सांग तिला?" काकूंनी जे घडलं ते सांगायला सुरुवात केली..."भाऊबीजेच्या दिवशी सुट्टी नसल्यामुळे, नंतर भेटूया म्हणत 25 nov 2015 ला माझे भाऊ घरी आले होते... त्या दिवशी मला लक्षात आलं की मला गाठ जाणवते आहे.**

कसली गाठ, कसली गाठ ह्याचा विचार करण्यापेक्षा दुसऱ्या दिवशी मी dr कडे गेली...Dr मैत्रीणच होती. तिने लगेच test करायला सांगितली. रिपोर्टची शेवटची ओळ वाचून लगेच oncologiest कडे appoinment book करायला लावली तिने...मी इतकी लकी आहे की सोमवारी रिपोर्ट मिळाला आणि मी मंगलवारची appoinment बुक केली, DR अनिल हेरूर ह्यांची, ते आठवड्यातून एकदा म्हणजे मंगळवारी असतात डोंबिवलीत. रिपोर्ट बघत Dr नी breast cancer असल्याचं सांगितलं. Operation लवकरात लवकर करावे लागेल. कारण cancer infection पसरायला सुरवात झाली आहे breast मध्ये. इथून पुढे शरीरात पसरला पोटात, फुफ्फुसात तर खुप अवघड होईल... हे गंभीर आहे. परिस्थितीचं गांभीर्य लक्षात आलं पण मी त्यांना एवढंच बोलली, 29 ला माझ्या मुलाची परीक्षा आहे...ती झाल्याशिवाय मी काही operation करणार नाही... DR म्हणाले मी एवढचं सांगु शकतो की अजूनही काही टेस्ट कराव्या लागतील, त्यांचे रिपोर्ट बघूया पण लवकरात लवकर operation करणं महत्वाचं आहे.पण बघ मी किती भाग्यवान आहे 29 पर्यंत सगळे report वगैरे मिळाले...कौशिक(मुलगा) परीक्षा देऊन घरी आला आम्ही त्याला सगळं सांगितलं.त्याला प्रचंड धक्का बसला. पण तो सावरला. तेव्हा कुठे मी ऍडमिट झाली.

काकूंच्या वाक्यावर मला खरच आश्चर्य वाटलं, मी त्यांना विचारलं, "काकू, तुम्हाला एवढा कॅन्सर झाला होता तरीसुद्धा तुम्ही म्हणतात मी भाग्यवान आहे, लकी आहे... इथे साध्या साध्या दुखण्यात पण लोक म्हणतात मीच का? मलाच का? तुम्हाला भीती नाही वाटली का? Dr लगेच operation करूया म्हणता आहेत आणि तुम्ही मुलाच्या परीक्षेसाठी वाट बघता आहात." "अग, मग काय? पोराने एवढी तैयारी केली आहे परीक्षेची ती कशी वाया जाऊ देणार ...काहीही झालं असतं तरी 29 पर्यंत थांबलीच असती मी..." (स्त्री ही अनंतकाळाची माता असते हे काही खोटं नाही.)

"खरंच सांगते, भाग्यवान होतोच आम्ही, खूपच गोष्टी आपोआप होत गेल्या... उदाहरण सांगायचं झालं तर, आमच्या बँकेमध्ये mediclaim सुविधा नव्हती इतकी वर्षे, oct 2015 पासून ती सुरू झाली. जो काही खर्च झाला 9 10 लाखाचा त्यातले 3.50 लाख mediclaim मध्ये मिळाले, cancer patient ना 1 L extra मिळतात ते मला मिळाले,

वर्षाच्या शेवटी जी काही रक्कम असते त्याचा buffer असतो बँकेत त्यातून काही रक्कम मिळाली... सांग कसं झालं हे सगळं..."

"बघ कसं असत ना बाळा, मागच्या जन्माचे काही भोग असतात ते भोगायचे होते म्हणून मला हे दुखणं मिळालं...पण मी विचार केला माझ्या सद्गुरूंनी मला ह्यात टाकलं तेच ताकद देतील आणि तसंच झालं ग ...त्यांनीच मला बाहेर काढलं... फुलासारखं सांभाळलं त्यांनी...एकंदरीत काय तर श्रद्धा महत्वाची... श्रद्धेने सगळ्या गोष्टी सोप्या होतात. मला ह्या पूर्ण प्रवासात कधीच खचून गेल्यासारखं वाटलं नाही. हीच सद्गुरूंची कृपा..."

हे सगळं माझ्यासाठी खुप वेगळं होतं. माझी उत्सुकता आता खरंच ताणली गेली आणि मी त्यांना विचारलंच "कसं जमलं तुम्हाला हे सगळं? तुम्ही तर chemo चालू असताना पण जॉब करत होतात ना"

"ह्याच क्रेडिट मात्र dr ना आणि विदुला(मुलगी) हिला देईन. cancer infection काढण्यासाठी operation झालं ना, तेव्हा हाताच्या काखेतून nodes(म्हणजे स्तनांमध्ये असलेल्या पेशी) काढले.सगळ्यात आधी तेच infect होतात..ते काढले, आणि infection थांबवलं तर आपण अर्धी लढाई जिंकली.Dr च काम केवढं अवघड असत बघ, अतिशय हुशार dr होते..त्यांनी 32 नोडस् काढले त्यातले 28 infected होते...त्यातला एक जरी मध्ये राहिला असता परत त्रास सुरू झाला असता... हे उजव्या हाताचं झालं.. डाव्या हातात एक पोर्ट घातला त्यातून chemo ची treatment होणार होती... ते करण्यासाठी जे DR होते तेजिंदर, ते भेटायला आले त्यांनी सांगितलं madam tension घ्यायच नाही अजिबात, सगळं व्यवस्थित होणार...जॉब वगैरे सोडायचा विचार पण नको मनात...२१ दिवसाची cycle असणार म्हणजे काय तर आज Chemo झाली की 21 दिवसांनी परत एकदा chemo घ्यायची, आता ह्या मध्ये 8 दिवस आराम करायचा, 15 दिवस ऑफिस, परत यायचा chemo असे 12 chemo आणि 18 rediation... जॉब करत रहा.. त्यांनी सांगितल्यावर पुढे काही प्रश्न च नव्हता पण chemo ने केस जातात मग असं office ला जायचं कसं... त्यावर मात्र मुलीने पर्याय काढला ...एक छान विग आणला.

माझे कुरळे केस काही वेळासाठी तरी सरळ झाले... अग एकदा तर माझ्या bank च्या कस्टमरने पण विचारलं, "मॅडम, केस straight केले का? "

आमचे बँकेचे मॅनेजर पण खुप चांगले आहेत त्यांनी पण खुप समजून घेतलं. तुझ्या काकांनी आणि कौशिकने बरयाच गोष्टी न सांगता सांभाळून घेतल्या, म्हणूनच तर मी जॉब continue केला..."

हे सगळं ऐकताना माझ्या डोक्यात हे आलं की "काकु, ह्या सगळ्या मधेच नोटबंदी आली होती ना तेव्हा तुम्ही working होतात ना, तो अनुभव कसा होता?"

" तो तर आमच्या मधला भांडणाचा विषय होता...रोज खूप उशीर व्हायचा, 12 12 तास काम चालू होत. माझे manager म्हणायचे, तुम्ही जा म्हणून पण एवढं काम चालू असताना, आपल्याच सहकार्यांना सोडून नाही निघता येत ग... घरी आली की काका पण खूप ओरडायचे...पण काम सोडून नाही निघता यायचं...त्यात सगळ्यात वाईट काय वाटायचं माहिती आहे...अग संध्याकाळी उशीर झाला की सगळे वडापाव मागवायचे मला ना हे सगळं खाणं टाळायला सांगितलं होतं. दुसरं कुठलंच आजारपण झेपणार नव्हतं ना... ते एक शल्य राहील माझ्या मनात."

आई शप्पथ!!!कोणाचं काय तर कोणाचं काय... "काकु तुम्ही एकदम भारी आहात. एक विचारू का तुम्हाला? आजूबाजूचे लोक कसे ट्रीट करतात? म्हणजे ज्यांना कळत तुम्हाला कॅन्सर आहे." "दोन प्रकारची माणसं असतात ... आम्हाला खूप छान माणसं भेटली, खुप खुप मदत केली त्यांनी. कौशिक ने एका dr च book दिलं होतं वाचायला ज्यात DR ना स्वतः कॅन्सर होतो आणि ते कसे बाहेर पडतात... त्यात एक तिबेटच्या एका dr उल्लेख केला होता...आम्ही त्यांची माहिती काढली ...तेव्हा कळालं, धर्मशाळाला जाऊन टोकन घ्यावं लागतं, मग त्या टोकनचा नंबर साधारणतः 3 दिवसात लागतो. एकूण 1 आठवडा तरी लागणार होता... पण तिथे माझ्या एका मैत्रिणीचे husband होते त्यांनी टोकन घेतलं...कौशिक एका दिवसात जाऊन औषध घेऊन आला..पुण्यातले DR सरदेशमुख, वाघोली ...ह्यांच्या औषधाची माहिती कळाली एका camp मधून..त्यांच्या औषधाचा खुप छान फायदा झाला... कुठे औषध देणाऱ्या nurses कौशिकला मी काय खायला पाहिजे काय नाही हे सांगायच्या...

तर कुठे औषध स्वस्त मिळेल ही माहिती मिळायची...खूप मदत करतात आजुबाजूचे लोक... बऱ्याच लोकांना आम्ही कळूच दिलं नाही कॅन्सर झाल्याचं... काळजी वाढते तर कधी negativity वाढते."

"मी ऐकलं होतं की, Chemo मध्ये खुप त्रास होतो. तुम्हाला पण झाला असेल ना."
"हो झाला तर, पण तुझ्या काकांनी आणि कौशिकनी खूप काळजी घेतली माझी... HB खुप maintain करावा लागतो...9 ते 11 मध्ये हवाच...पण chemo मुळे जेवणावरची वासनाच उडून जायची बऱ्याच वेळा, बऱ्याच वेळा रात्री तर फक्त भाज्या टाकून केलेली पातळ खिचडी खायचे मी... एकदा रात्री खूप ऍसिडिटी झाली होती... कौशिक कुठे जाऊन काय काय घेऊन आला होता सांगता सोय नाही...माझा तर हाच अनुभव आहे, घर मजबूत असलं ना... काही त्रास होत नाही... सगळ्यांनीच खूप काळजी घेतली माझी...काही chemo पुण्यात झाले..मी विदुलाकडे आली होती...दीनानाथ हॉस्पिटल chemo होते...तेव्हा जावई persistence मध्ये होते सकाळी ते ड्रॉप करायचे हॉस्पिटल मध्ये...सगळ्याच गोष्टी सोप्या होत गेल्या...सद्‌गुरूंची कृपा होती ही... ते सतत माझ्यावर लक्ष ठेवून होते...ताकद देत होते..."

"काकु, हे सगळं ऐकल्यानंतर तुमच्याबद्दलचा आदर खुप खुप वाढला..आम्हाला सगळ्यांना तुमच्याकडून चार समजुतीच्या गोष्टी ऐकायला आवडेल...सांगाल?"
"एक सांगेन,समजा कधी असा प्रसंग आलाच तर कमीत कमी लोकांना तुमच्या आजाराची माहिती असू द्या.negativity आजूबाजूला असणार नाही ह्याची काळजी घ्या. कामाचा किंवा कुठल्याही भांडणाचा stress मेंदू पर्यंत जाऊ देऊ नका... ह्या सगळ्याचा परिणाम आजारपण ह्या मधेच होतो... सगळ्या मुलींनी नियमित आरोग्य तपासणी करा... गोष्टी extreme पर्यंत नका जाऊ देऊ... श्रद्धा ठेवा. कुठल्याही देवा वर, गुरु वर...असं कोणी तरी ज्याच्याकडे बघितलं तरी किंवा स्मरण केल्यावर तरी सगळं नीट होईल ह्याची खात्री मनाला पटेल."

ह्या प्रश्नाबरोबर आमच्या गप्पा संपल्या असल्या तरी काकूंनी दिलेले विचार डोक्यात फेर धरायला लागले होते.काकूंच्या बरोबरची ती संध्याकाळ, माझ्या आयुष्यातील सगळ्यांत सुंदर संध्याकाळ आहे... माझ्यातली सकारात्मक 'ती' शोधायला काकूंनी मला खुप मदत केली...

**एक गोष्ट मला समजली, ताकद फक्त ती नसतें जी 100 किलो वजन उचलायला मदत करते... ताकद ती पण असते जी निराशेला आशेची झालर लावून जगणं सोपं करून जाते... जी काकूंमध्ये खूप जास्त होती...**

**अश्या आमच्या काकूंना आमच्या स्त्री-विशेषांका कडून मानाचा मुजरा...**



# आता कुठे मला

*डॉ. संजीवनी तोफखाने*



आता कुठे मला मी कळू लागले आहे
अन् वास्तवाकडे मी वळू लागले आहे //

स्वप्नास घेउनीया किती धावले बाई
मिथ्या मृगजळ हे आकळू लागले आहे //

माला जरी यशाची मला लाभली केव्हा
लोकांस पाहवेना जळू लागले आहे //

गगनास मेघ हे का असे भार वाटावे
अश्रू बघा तयांचे गळू लागले आहे //

सोडून मायबापा जरी सासरी आली
हुंडा हवा म्हणोनी छळू लागले आहे //

या वासनांध लोका कसे थोपवावे हो
हतबध्द होते तळमळू लागले आहे //

स्वार्थांध राज्यकर्ते, नसे लाज हो त्यांना
हे वाद नित्य काही दळू लागले आहे //

# *रागिणी देसाईचा थरारक प्रतिशोध*

*अमृता जोशी*

सध्या अनेक वाहिन्यांवर अनेक मालिका चालू असतात पण त्यातली एखादीच कायमची आपल्या स्मरणात राहते. झी युवावरची रुद्रम् अशाच काही मोजक्या मालिकांमधील एक म्हणावी लागेल. गिरीश जोशींच्या प्रभावी लेखणीतून आणि भीमराव मुडे यांच्या दिग्दर्शनातून साकारलेली ही मालिका एका सामान्य स्त्रीच्या असामान्य धैर्याबद्दल भाष्य करते. ह्यातील प्रमुख भूमिका "रागिणी देसाई" साकारली होती गुणवान अभिनेत्री मुक्ता बर्वेने! तिने प्रेक्षकांना पुन्हा एकदा दूरचित्रवाणीकडे वळण्यास भाग पाडले. सामान्यांतील असामान्य शक्ती ही कुठेतरी त्यांच्या सामान्य असण्यातच दडलेली असते. सामान्य व्यक्तीला अनेक समाजमान्यता, बंधने, कायदे, नियम पाळत स्वतःच्या जबाबदाऱ्या पार पाडायच्या असतात. अनेकदा कौटुंबिक स्वास्थ्य राखण्यासाठी ही व्यक्ती कोणताही त्याग करताना मागेपुढे पहात नाही. इतके करूनही कुटुंबीय निर्धास्त राहतील ह्यासाठी तिला स्वतःच्या चेहऱ्यावर हसू आणि समाधान आणावे लागते. ह्यासाठी मानसिक कणखरपणा लागतो. प्रसंगी असामान्य धैर्य लागते. सामान्यांना त्यांच्या ह्या ताकदीचा बरेचदा अंदाजच नसतो. अनेक अडचणी पार करून जगतानाही त्यांची राष्ट्रनिष्ठा वाखाणण्याजोगी असते. सर्व कायदे, नियम, मूल्ये पाळताना त्या सामान्य व्यक्तीलाच अभिमान आणि आनंद मिळत असतो कारण तिला कुठेतरी प्रगतीची आणि शुभ गोष्टींची किरणे खुणावत असतात. पण कधीतरी तिच्या ह्या सकारात्मकतेला छेद देणारे काहीतरी भयंकर घडते आणि ती व्यक्ती पुरती हबकून जाते. अशाच एका सामान्य चेहऱ्याचे नाव होते, रागिणी आपल्या माणसांच्या सुखात सुख मानणाऱ्या रागिणीच्या आयुष्यात फार काही वेगळे घडण्याची चिन्हे नसताना अचानक इतका मोठा आघात व्हायचा होता की ज्याने कोणीही सामान्य व्यक्ती कोलमडून पडेल. तिचे कुटुंब एका झटक्यात होत्याचे नव्हते झाले आणि तिचे अवसान गळाले. जेव्हा सत्य समोर आले, तेव्हा असेही जग असते आणि स्वार्थासाठी माणसे कायद्याच्या पळवाटा शोधत शोधत इतक्या नीच पातळीला जाऊ शकतात हे स्पष्ट झाल्यावर हळूहळू त्या सामान्य स्त्रीने कात

टाकायला सुरुवात केली. काहीशा कमकुवत झालेल्या मनाला एका मानसिक आजारामुळे जणू बळच मिळाले आणि सर्वशक्तीनिशी तिने प्रतिशोधाचा शंख फुंकला. पण जिथे सामान्यांच्या मरणार्त किंकाळ्याही कोणी ऐकत नाही, तिथे हा शंखनादही कोणी गांभीर्याने घेतला नाही. अखेर एका सामान्य गृहिणीची झेप ती; असून असून किती अवकाश व्यापणारी असणार! पण इथे रागिणीला जमिनीकडे खेचणारे बंधच कापले गेले असल्याने तिची भीती नाहीशी झाली. तिची भव्य गगनभरारी सर्व दुर्जनांचे अवकाश त्यांच्याच रक्तिम्याने माखणारी ठरली. तिच्या दिवंगत नवऱ्याच्या विश्वासघातकी आणि निर्घृण खुनाची तोडीस तोड शिक्षा तिने त्याच्या गुन्हेगारांना दिली. शिवाय त्याचे अपूर्ण राहिलेले समाजकार्यही पूर्ण केले. तिच्या प्रतिशोधाच्या आगीत भस्मसात होणाऱ्या नराधमांचे हाल सर्वस्व गमावलेल्या त्या एकेकाळच्या सामान्य अबलेने आपल्या नजरेत साठवून घेऊन अखेर कायद्याला शरण जात सामान्य व्यक्तीची उच्चतम ताकद दाखवून दिली.

रागिणी सुरुवातीला परिस्थितीपुढे हतबल होऊन नैराश्याच्या गर्तेत जाते. त्यातून बाहेर यायला तिला मानसोपचारतज्ज्ञ मदत करतात. मधेच तिला समजते की आपल्या गाडीचा अपघात होऊन आपले वडील, नवरा आणि मुलगा त्यात गेले असं आपण समजत होतो, पण तो अपघात नव्हता. ह्यातून एक एक सत्य आणि त्यासंबंधी व्यक्तिरेखा हळूहळू तिच्यासमोर येतात. थरारक मालिका आहे म्हणून ती अविचाराने सर्वांचा खून करत फिरताना दाखवलेली नाही. तसेच सत्य शोधण्याच्या तिच्या प्रवासातील सर्व टप्पे विस्ताराने दाखवले आहेत. सुरुवातीला ती चंदूदादा नामक गुंडाकडून प्राथमिक प्रशिक्षण घेताना दाखवली आहे. तरीही ती गुन्हेगारी जगतात मुरलेली नसल्याने अनेकदा काही चुका करून अडकते. त्यातून धडे घेत ती पुढची वाट चोखाळते. हे सर्व दाखवताना तिचे तिच्या आईशी असलेले नातेदेखील उत्तमरीत्या दाखवले आहे. रागिणी देसाई जसजशी ह्या मृत्युतांडवात गुंतत गेली, तसेच प्रेक्षकही ह्या कथेत तितकेच गुंतले. रागिणीची व्यक्तिरेखा केवळ एक स्त्री म्हणून समोर न येता एक व्यक्ती म्हणून समोर येते. नेहमी दाखवल्या जाणाऱ्या अतिशय कौटुंबिक, सोशिक, त्यागमय मूर्ती, नाहीतर थेट कारस्थानी असणाऱ्या कंटाळवाण्या स्त्री व्यक्तिरेखांना छेद देणारी ही व्यक्तिरेखा आहे.

ही नुसती मुळूमुळू रडणारी बाई नाही तर प्रयत्नपूर्वक एखाद्या गोष्टीचा पाठपुरावा करणारी, त्यासाठी डोकं चालवणारी, वेषांतर करणारी, भल्याभल्यांना गुंडाळणारी बाई आहे. अशी स्त्री व्यक्तिरेखा बघायला लोकांना आवडली. ह्यातील सर्वच स्त्री
व्यक्तिरेखा तथाकथित सौंदर्याच्या व्याख्या मोडीत काढत अधिकाधिक वास्तववादी दाखवल्याने त्या शोभेच्या बाहुल्या न राहता व्यक्ती म्हणून समोर येतात आणि त्या त्या भूमिकांचे महत्त्व त्यामुळे अबाधित राहते. एक सर्वसामान्य व्यक्ती वेळप्रसंगी काय काय करू शकते ह्याची ही कथा असल्याने ह्या मालिकेला व्यापक प्रेक्षकवर्गाची पसंती लाभली. नेहमी बायकाच मालिका बघत बसतात असा एक सूर असतो तोही ह्या उत्कंठावर्धक मालिकेने मोडून काढला. ही नुसतीच हिंसक सूडकथा नाही, तर तिला एका सामाजिक बांधिलकीची सशक्त उपकथा असल्याने रागिणीचा पुढचा प्रवासही तितकाच सहज झाला आणि तो सर्व प्रेक्षकांना भावला. आपल्या मनात खूपदा अनेक प्रश्न येतात पण आपण त्यांची उत्तरे शोधायला रागिणीसारखे बाहेरच्या जगात थेट जाऊ शकत नाही. म्हणूनच का काय, आपण आपल्यापुरते एक जग बनवतो ज्यात आपण सुखी आणि सुरक्षित असल्याचे स्वतःला पटवून देत देत आयुष्य व्यतीत करतो. पण आपल्यासारख्याच कोणा सामान्याने, विशेषतः एका गृहिणीने व्यथित होऊन ही उत्तरे मिळवायचे ठरवलेच तर काय काय होऊ शकते त्याची झलक म्हणजे रुद्रम्!
असे म्हणतात की आपले जीवनच नाही तर मरणही दुसऱ्याच्या कामी यावे. रागिणीने तिच्या नवऱ्याप्रमाणेच हे दोन्ही केले. फक्त खंत इतकीच की त्यासाठी रागिणीला मनात आणि स्वभावात नसताना गुन्हेगार बनावे लागले. ह्या प्रवासात तिचे सामान्य असणे अनेकदा तिच्याच पथ्यावर पडले. गुन्हेगारी मार्गाने जात असता गुन्हेगारांच्या डोक्यात शिरून तिने त्यांचेच डाव त्यांच्यावर उलटवले. इतके होऊनही तिच्यातल्या नैतिक मूल्यांनी तिला अमानुषी होण्यापासून रोखले. एका थरारक प्रवासाचा शेवट इतका संयत होऊ शकला ते तिच्या सामान्य असण्यामुळेच! आपल्या आसपासच्या चांगल्या व्यक्ती त्यांच्या मृत्यूनंतरही प्रेरणा देत राहतात. ती प्रेरणा काही अंशी तरी घेऊन जर आपण सजग नागरिक बनू शकलो तर अशी समाजविघातक कृत्ये करणाऱ्यांची व्यवस्था नक्कीच खिळखिळी करू शकतो.

**अतिशय वेगळा विषय घेऊन त्यात गुन्हेगारी विश्वाचे आणि सामाजिक भान असलेले एरवी क्लिष्ट भासणारे पैलू मांडण्याचे शिवधनुष्य ह्या मालिकेने समर्थपणे पेलले आणि त्याच वेळी सर्वसाधारण प्रेक्षकाला भावेल अशा स्वरुपात मालिका साकारल्याने या रागिणीने प्रेक्षकांचे मन जिंकले.**



# *आजी*

*निरुपमा महाजन - 7757009515*

कापरा आवाज । थरथरे हात ।
मऊ लोण्यागत । स्पर्श वाटे ।।

किलकिले डोळे । अंधुक नजर ।
मायेचा पाझर । अखंडीत ।।

मऊसूत साडी । स्वेटर थंडीला ।
टोपडे कानाला । बाळापरी ।।

जुनीशी पैठणी । काढे पेटीतून ।
छातीशी धरुन । कुरवाळी ।।

बोलता बोलता । कुठे हरवते ।
सदा आठवते । भूतकाळा ।।

द्वाड नातवंडां । गोष्टी रंगवून ।
स्वप्नांच्या जगात । रमविते ।।

प्रेमे थोपटते । गोधडीत घेते ।
जीव ओवाळते । त्यांच्यावरी ।।

घासातला घास । काढून ठेवते ।
मला भरवते । अन्नपूर्णा ।।

हळू गुणगुणे । जप कुठलासा ।
देतसे दिलासा । पुण्याईचा ।।

निजलेले घर । दमून भागून ।
राखते जागून । आजी माझी ।



फोटो-**सचिन भोर**

*(स्त्री म्हणजे शक्ती, शुद्ध ऊर्जा यांचे मूर्त स्वरूप.)*

# मला भावलेली ती

माधवी देवळाणकर

ती होती तशी साधीच, काळी सावळी थोडी कृश, एका पायाने थोडी लंगडी पण देहाने काटक, कोणतंही काम हातात घेतले की न थांबता पूर्ण करूनच थांबणारी, एक आंबाडा, कपाळावर एक मोठ कुंकू, साधीशीच साडी आणि चेहऱ्यावर न उमगणारे एक हसू.....

मला वाटते त्या वेळेसच्या सर्व कष्टकरी बायकांचे ते एक प्रातिनिधिक असे एक ठळक रूप तिच्यात सामावलेले होते.

शाळेत जायच्या वयापासून मी तिला पाहत आले होते, तशी तिची आणि माझी भेट अगदी अचानक पणे झालेली...

मी नेहमीसारखीच शाळेत निघाले होते आपल्याच नादात इकडेतिकडे पाहत, रमतगमत....

आता त्या वेळेसचा काळ म्हणजे तीस पस्तीस वर्षांपूर्वीचा त्यामुळे मुलांना स्कुलबस, स्वतः नेवून शाळेत सोडणे वैगरे असले लाड गावात तर अजिबातच नव्हते त्यामुळे फक्त मुलांना झोपेतून उठवून दूध किंवा चहा जे असेल ते पाजवून शाळेत जायला दोन थपडा मारून तयार करणे हे आद्यकर्तव्य केले की पालकवर्गाची इतिकर्तव्यता होत असे,

असो......

त्या दिवशी मी पण अशीच रमतगमत रिबिनीचे एक टोक तोंडात चघळत गोडचिमणीच्या झाडाकडे आशाळभूत नजरेने पाहत, खाली पडलेली गोडचिमणी व पुंगीचे फुल ओच्यात भरत शाळेत माझी वरात निघाली होती आणि तेवढ्यात भोsss भोssss असा आवाज करत एक जीप कुठनशी आली त्या आवाजाने मी एकदम गोंधळले आणि घाबरून मोठयाने ओरडले

त्या ओरडण्याने का अजून कशाने माहिती नाही ती जीप करकचून ब्रेक दाबून थांबली आणि आतापर्यंत रस्त्यावरची कोठे कोठे लपून बसलेली माणस एकदम धावत आली, त्या माणसामध्येच ती पण होती...

आता एवढ्या सगळ्या माणसाची गर्दी व तो जीपवाला जाडजूड मिशिवाला माणूस बघून मी मोठयाने भोकाड पसरले, कालच तर आईने त्या पोर पळवून नेणाऱ्या माणसाची गोष्ट सांगितली होती तीच आठवली मला, तोच पोर पळवून नेणारा माणूस रूप बदलून जीप घेऊन मला पळवून नेण्यासाठी आला,

अस वाटून मी जमिनीवर फतकल मारून भोकाड पसरले व तिथे एकच गलका सुरू झाला, आता छोटस गाव आमचं तिथे सगळेच एकमेकांना ओळखत होती त्यात मी तिथल्या प्रतिष्ठित घराण्यातील त्यामुळे आम्ही गावात फेमस का काय म्हणतात तसे....
मी भोकाड पसरून रडतेय व ती गर्दी नुसतीच बडबड करत होती व त्या जीपवाल्याला काही तरी बोलत होती तो जाडजूड माणूस एवढासा चेहरा करुन ऐकून घेत होता, तेवढ्यात ती सरसावली मला जवळ घेत म्हणाली
"अय्यो पाप! लेकरू पडलं की भाड्या, कूट बघून मोटार चालवत होतास र..!?
आणि माझ्या चेहऱ्यावर हात फिरवत, बोट मोडून म्हणाली,
"चला अम्मा, तुम्हाला घरी नेवून घालते, लागलं नवं तुमाला"
आमच्या गावाकडे तेलगु बोलणारी माणस खूप... काही तरी एनडु गुंडू बोलत असायची काही कळायचं नाही ती पण त्या गाडीवाल्याला तेलगुतून बोलत मला उठवून हात पकडून माझा अनमोल ऐवज स्वतःच्या ओच्यात गोळा करून मला घेऊन घरी निघाली, मला तर ती एका देवदूतासारखीच वाटली एक तर शाळा बुडाली व माझा ऐवज सहीसलामत मला वापस मिळाला होता. अशी आमची वरात तिच्या हातात हात घालून घराकडे निघाली...
ती रस्ताभर काही तरी बोलत होती, मधेच एखादा तेलगू शब्द तो मला कळत नव्हता पण तिच्या थोड्या जाड्या भरड्या  आवाजात माया मात्र ओतप्रोत होती आमचं वेंधळे ध्यान तिच्या अंगावरील मोठ्या मोठ्या लाल फुलांच्या साडीकडे  मोठ्या कुतूहलाने पाहत निघाले होते, हीच माझी व तिची पहिली भेट...
घरी गेल्याबरोबर तिने दरवाजातूनच  माझ्या आईला हाक मारली व ती दरवाज्यातच थांबली, तिची हाक ऐकून आई बाहेर आली..
"काय ग पीरा..?एवढ्या मोठयाने कशाला हाक मारत आहेस?"
मला प्रथमच तिचे नाव कळले, तिचे नाव ऐकूनच मला फसकन हसू आले..
पीरा...
"बघा ना अम्मा..आज टून्नू बाय गाडीखाली येत व्हत्या ना..  म्या तिथूनच चालले व्हते म्हणूनशान बगीतल व लागोलाग घराला घेवून आले"
मला आता तिचा खूप राग आला एवढं छान 'माधवी' नाव असताना तिने मला 'टून्नू' म्हणण्याचा..

मी आईला पण खूप वेळा सांगितले होते मला 'माधवी' म्हणत जा म्हणून पण हे मोठे लोक लहान मुलांचे अजिबात ऐकत नाहीत...

आता आईचे लक्ष माझ्याकडे गेले, तिने माझ्याकडे निरखून पाहिले व सिटी स्कॅन केल्यासारखे मला जवळ घेवून म्हणाली,

"लागलं नाही ना कुठे?"

मी इकडून तिकडे म्हणजे पूर्वेकडून पश्चिमेकडे अशी मान हलवून नाही असं सांगितले,

"मग काय मातीत लोळून आलीस का..? जा कपडे बदल"

इति आई...

मी पीराच्या ओच्यातील माझा ऐवज ताब्यात घेतला व घरात पळत पळत शिरले...

अशा रीतीने पीराची एन्ट्री आमच्या घरात कायमचीच झाली म्हणजे आईने तिला घरकामासाठी ठेवून घेतले ती आमच्या घरात आली व कुटुंबातील एक सदस्यच झाली

दररोज सकाळी ती यायची, भांडे घासणे, वरची काम, झाडझुड इत्यादी इत्यादी...

तिची एक सवय होती मूडमध्ये असेल तर आपल्या जाड्या आवाजात नाकातून छान छान तेलगुतून गाणं म्हणायची तिचे ते बोल कळायचे नाहीत पण ते गाणं ऐकावे असे वाटायचे, आम्ही बहिणी कितीदा तरी तिला गाणं म्हणायला लावायचो...

दर रविवारी ती मोठं घमेलभर पाणी तापवायची व आम्हाला कढत कढत पाण्याने शिकेकाई चोळून चोळून त्या निबर झालेल्या  पण मायेचा ओलावा असलेल्या हाताने डोक्यावरून नाहू घालायची अगदी नाकातोंडात शिकेकाई जाईपर्यंत...

ही प्रथा अगदी आम्ही मोठं होईपर्यंत कायम होती अगदी मोठं झाल्यावर पण कधी कधी ती नाहू घालायची...

जशी जशी मोठी होत गेले तशी तिच्याबद्दल बरच काही कळत जात होते,

पीरा लहान असतानाच तिला पोलियो झाला व तिचा एक पाय अधू झाला होता त्यामुळे तिच्या वडिलांनी तिच्यासारख्या एका मुलाशी तिच्यापेक्षा पंधरा वर्षे मोठया जो मासे पकडत होता त्याच्याशी लावून दिले होते..

तिची मुलं लहान असतानाच देवाघरी गेली व पस्तिशी नंतर एकच मूल नवसाने वाचले म्हणून अत्यंत लाडात त्याला तिने वाढवले त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला, वाईट संगतीने व लाडाने त्याला पण लहान वयातच नको नको ते व्यसन लागले....

नवरा दारुडा मनात आले तर घरी पैसे द्यायचा नाही तर हिलाच मारून हिच्याकडून पैसे घेवून दारू प्यायचा...

दर दोन तीन दिवसांआड तो तिला मारायचा

एकदा मी तिला बोलले,

"एवढा मार का खातेस तू त्याचा, सोडून दे त्याला, नाही तरी तुझ्याच पैशांवर तर तो मजा मारत आहे" तर ती हसून बोलली.

"कूट जाणार मी....? बाप व भाऊ पण दारुडा, माज्या जाण्यामुळे माज्या आईला मातर तरास व्हईल...तीच बिचारी कसतरी देवा देवा मनुन दिवस ढकलती... आणि तुमाला सांगते बाई, हे कुकु हाय म्हणून कपाळाला सोभा हाय बगा, एकदा का नवऱ्याचा हात सुटला की रस्त्यावरच कुत्र पण आपल्याकडे बगून तंगडी वर करतय, लय वंगाळ जीन बाई बाईमाणसाचं"

बोलता बोलता तिने नेमके समाजातील बाईच्या स्थानाचे कटू सत्य सांगितले.....

ती शिकलेली नव्हती पण पोथ्या पुराणाचे तिला ऐकून ऐकून ज्ञान होते

तिच्या गाण्यातून स्त्रियांवरील अन्यायाचे बोल काळजात झिरपत जात...

एकदा रात्रीचे दहा वाजले असतील, एकदम कडी वाजण्याच्या आवाजाने मी बाहेर गेले तेंव्हा काही तरी मी बारावीत असेन, अभ्यास करत होते आणि

ते लहान गाव रात्री आठलाच जिकडे तिकडे सामसूम होत असे आणि दहाला दरवाजा वाजला की छातीत धस्स झाले...

"कोण आहे..."

"टून्नू बाय मी पीरा... दरवाजा उगडा"

"तू एवढया रात्री, काय झाले?"

असे म्हणतच मी दरवाजा काढला तर पीरा अंगावरची साडी अर्धवट फाटलेली, कुंकू ओघळलेले, चेहऱ्यावर अंगावर माराचे वळ, केस अस्ताव्यस्त व सोबत तिचा लहान मुलगा अस तीच रूप पाहूनच मी हादरले, तेवढ्यात आई आली, आईला बघताच ती आईच्या गळ्यात पडून रडू लागली,

आईने तिला शांत केले, प्यायला पाणी दिले तिच्या मुलाला व तिला पहिले जेवायला घातले नंतर विचारले,

"काय सांगू बाई, भाड्या दारू पीत व्हता, मारत व्हता ते सहीन करीत होते पण आज एका बाईला घरी घेऊन आला, आणि मला मारूनशान घराबाहीर काडल, लय मारलं बगा, म्या नाई मनलो तर... आता ऐवड्या रातीच कूट जाऊ मनुन तुमच्याकडे आलो"

आईने तिला हळद आणि तेल लावले आणि ओसरीवर झोपायला दिले, नंतर आई व ती बराच वेळ बोलत बसल्या होत्या, त्यांचं नात आता फक्त एक मोलकरीण व मालकिणीचे न राहता एका स्त्रीचे दुसऱ्या स्त्रीशी असणारे, एकाच जातकुळीतील, त्या पोरक्या भावनेशी साधर्म्य साधणारे झाले होते...

दुसऱ्या दिवशी मी उठले त्याच्या आधी ती उठून बाहेर सडा टाकत काही तरी गुणगुणत होती, मला आश्चर्य वाटले, आदल्या दिवशी एवढे रामायण घडूनही ती आता ताजीतवानी होती,

मी तिला विचारले,

"कशी आहेस पीरा.."?

"छान हाय बाय..."

"अग! कशाला काम करतेस..?राहु दे आजच्या दिवस"

"ते तर बगा रोजचंच झालय मला, आता मार नाही खाल्ला तर झोप येत नाई बगा आता"

ती हसत हसत म्हणाली, ती हे म्हणाली खर पण त्या आवाजातील वेदना शब्दातीत होती, आणि ती पुन्हा कामाला लागली, मी पण सर्व आवरून कॉलेजमधे गेले, संध्याकाळी घरी आले तर पीरा गेली होती, मी आईला विचारले,

"आई! पीरा कुठे आहे?"

"अग ती घरी गेली आपल्या"

"अग! अस अचानक, आणि ती दुसरी बाई...."

"तिला त्या शिवाय गत्यंतर नाही ग..! कुठे जाईल लहान पोराला घेवून, माहेरी थारा नाही, रस्त्यावर राहू शकत नाही, आता राहते म्हणाली पोराला घेवून त्याच घरात एका कोपऱ्यात"

मी अतिशय सुन्न झाले, आणि कुठूनतरी माझ्या कानावर सूर येऊन आदळले....

"सर्वस्व तुजला वाहूनी, माझ्या घरी मी पाहुणी"

असच तर तिच्या बाबतीत घडलं होत, जे घर तीन स्वतःच्या कष्टावर उभं केले होते, त्या घरात तिची जागा फक्त एका दयेच्या कोपऱ्यात होती...

स्वतःचे होते नव्हते ते किडुकमिडुक विकून तिने दोन खोपटाच घर बांधले होते, आईकडून काही रक्कम घेतली होती त्यासाठी, ते पैसे ती अजून फेडतच होती, घर बांधून झाले तेंव्हा मोठी पूजा केली होती आम्हाला पण जेवायला बोलवले, मी व मधली बहीण गेलो होतो, तेव्हा खूप आनंद झाला होता तिला, दोनच खोपटाच घर पण महाल असल्यासारखा तिच्या तोंडावरून आनंद पसरला होता, आम्हाला दोन्ही खोल्या दाखवल्या व आम्हाला घोंगडीवर बसवून घरातील अन्न शिजवून घातले होते, तिचा तो फुललेला चेहरा मनात घट्ट घर करून अजून बसला होता, आणि आज त्याच घरातून तिला बाहेर काढले होते.

मलाच खूप राग आला, कशाचा माहीत नाही पण मी खूप चडफड व चिडचिड केली आईवर, तिलाच बोलले,

"तू तरी कशाला जाऊ दिलेस तिला.? आता कशी राहील तिथे ती, मुळात तिला जावंच कस वाटलं..?, काय गरज होती तिची, काम करून पोट भरत होती ना स्वतःची...?मग...?"

"राहिली असती ना अशीच तर निदान रोजचा मार तरी वाचला असता तिचा"

आई माझ्याकडे बघून हसली, व मला जवळ बोलवत हात धरून स्वतःच्या जवळ बसवत म्हणाली,

"हे बघ उगाच चिडचिड करू नकोस, ती इथे जरी राहिली असती तरी तिची ओढ कायम घराकडे राहिली असती, तिचा नवरा दर दोन दिवसाने येवून हक्काने पैसे घेवून गेला असता, आणि अग आपण बायका ग!, अशाच तर असतो, थोडे ही आपल्या मायेच्या माणसाने गोड बोललं की पघळणाऱ्या, सर्वस्व वाहून देणाऱ्या, अगदी आपल्या पदरात काहीही शिल्लक न ठेवता सर्व काही उधळून देणाऱ्या, आपलं घर, नवरा

ह्यातच रमणाऱ्या, भले मग तिथे आपली काहीही जागा नसली तरी तिथेच लुडबुड करत आपला हक्काचा एक कोपरा तयार करण्यासाठी अख्खे आयुष्य पणाला लावतात, ही सर्वच सर्वसामान्य स्त्रीची कथा आहे, मग पीरा कशी वेगळी असणार..? हं आता काही काही जणी धाडस करून उंबरठ्या बाहेर पाय टाकतात ही पण काही जणी यशस्वी होतात आणि काही एकाकीपणे आयुष्याशी लढा देत आपलं जीवन नातेवाईक किंवा स्वतःच्या अस्तित्वाशी तडजोड करत घालवतात"

मला आईचे म्हणणे पुष्कळ पटले व बरेचसे पटले नाही, पण मी शांत मात्र झाले.

आता पीराच्या आयुष्यातील दुसरा टप्पा तिच्या वयाच्या चाळीशी नंतर सुरू झाला होता, तरुणपणी साधारण जरी असली तरी ती उत्साही, बडबडी होती, आता मात्र ती बरीचशी मिटून गेली होती, जास्त बडबड नाही, गप्पा नाही, कामास काम करायची व शांत बसून राहायची, आजकाल ती आईकडून भाकरी वैगरे जास्तीच्या घेवून जायची का तर तिच्या सवतीला दिवस गेले होते आणि घरात कमवणारी ही एकटीच, नवरा पहिल्यासारखाच, खविस बरा अस म्हणायची वेळ आणणारा, त्या दिवस गेलेल्या बाईला पण तो मारहाण करायचा, ती पण कधी कधी आमच्याकडे हळूहळू कामाला येऊ लागली होती, आता दोघी मिळून घराचा गाडा ओढत होत्या, तिचे नाव लक्ष्मी होते. नाव जरी लक्ष्मी पण हाती कथिलाचा वाळा अशी गत होती तिची.

तिच्यापण घरी आठराविश्व दारिद्र्य ही दिसायला बरी, एका मुसलमान मुलाच्या नादी लागली, त्याने वापर करून फेकून दिले, आणि पीराचा नवरा देवदूत म्हणून गेला व फक्त अंगावरील साडीनिशी त्याने हिला लग्न करून घरी आणले, तिच्या माहेरी आनंदच झाला, मग कसलीही चौकशी न करता वीस वर्ष मोठया असलेल्या पीराच्या नवऱ्याशी लग्न करून देऊन त्यांनी आपले कर्तव्य संपवले,

अशी ही पीराची व लक्ष्मीची जोडी आता घरात रुळत होती, आणि लक्ष्मीला मुलगी झाली तेंव्हा पण पीराने उसनपासण करून लक्ष्मीचे बाळंतपण पार पाडले, बारसं केले.

असे दोन चार महिने निघून गेले व एक दिवस बातमी कळली, लक्ष्मी कुणाचा तरी हात धरून मुलीला पीराच्या पदरात देवून पळून गेली...

ती पळून गेली तर पीराच्या नवऱ्याने पीरालाच बदड बदड बदडली, हिच्यामुळेच लक्ष्मी बघर सोडून निघून गेली म्हणून...

आता पीरा त्या छोट्या पोरीला घेवून आमच्याकडे कामाला येऊ लागली, मध्यंतरी तिच्या नवऱ्याचे लिव्हर खराब झाले त्यामुळे आता तो बराच वेळ घरीच बसून असायचा पण पीराला मारण बरचस कमी झाले होते, तिचा पोरगा ही थोडे फार पैसे हिच्या हातात ठेवायचा, हिने कधी चौकशी नाही केली तो पैसा कुठून आणतोय म्हणून, ती आता त्या छोट्या सावित्रीच्या बाळलीलात रंगून गेली होती...

असेच दिवस जात होते आता सावित्री मोठी होत होती, आईचंच रूप घेवून आली होती, आम्ही आमचे कपडे तिला वापरायला द्यायचो, दिवाळीत, सणाला आई तिला नवीन कपडे करायची...

एक दिवस पीरा जात्यावर काही तरी दळत तेलगुतून गाणं म्हणत होती व सावित्री तिला साथ देत होती, मी पीराला त्या गाण्याचा अर्थ विचारला तेंव्हा तिने जे सांगितले ते ऐकून अंगावर काटा आला...

**गाण्याचा मतितार्थ असा होता...**

*"ह्या कपाळावर जो लालबुंद सूर्य*
*प्रत्येक बाईच्या भाळावर उगवला आहे*
*तो स्त्रीची अस्मिता, तिची वेदना, शोक*
*ह्यांचे जळजळीत प्रतीक आहे,*
*ही रक्तरंजित खूण म्हणजे*
*तिने दिलेला स्वतःच्या मनाचा*
*शरीराचा बळी आहे,*
*ती स्वतःच ह्या सुर्यरूपात*
*अडकत जाते, मोहते*
*आणि शेवटी एक*
*अग्नीचा तप्त गोळा*
*माथ्यावर वागवत*
*धर्माचे पालन करत स्वतः स्वतःचे*
*अग्नीला तर्पण देत नाही तोवर*
*तिची ह्यातून सुटका नाही"*

**माझ्या लग्नात तिने व सावित्रीने खूप काम केले, मला पोटाशी धरून खूप रडली, तेंव्हा मला तिने जेव्हा मी मातीत फतकल मारून रडत बसले होते तेंव्हाही तिने असेच पोटाशी बिलगून घेतले होते त्याची आठवण झाली.**
**नव्या नवलाईच्या माझ्या दिवसात वर्ष दोन वर्षे सरून गेली, आणि मी एकदा माहेरी आले, असेच आईकडून लाड करून घेऊन मी लोळत होते तेंव्हा सावित्री कामाला आली, हातात चुडा, गळ्यात नवीन मंगळसूत्र...**
**मला आश्चर्यच वाटले, सावित्री फक्त सोळा का सतरा वर्षाची होती...**
**"हे काय ग सावित्री...?" कधी लग्न झाले तुझे"**
**तर ती लाजत लाजत म्हणाली,**
**"ताई, महिना दीड महिना झाला असेल"**
**"अग पण तू शिकत होतीस ना?, आणि पीरा कुठे आहे"**

**"त्या जेल मध्ये"**
**"काय..!?"**
**मी जवळ जवळ किंचाळलेच...**
**मग आईने मला सांगितले, एक दिवस तिचा मुलगा काही माणसांना घरी घेवून आला व सावित्रीला विकण्याचा प्रयत्न केला तेंव्हा पीराने कोयता घेवून त्यांना प्रतिकार केला, त्या झटापटीत पीराने स्वतःच्या मुलाच्या मानेवर कोयता चालवला व सावित्रीला वाचवले...**
**मग पीराच्या नवऱ्याने सावित्रीचे लग्न स्वतःच्या बहिणीच्या मुलासोबत लावून दिले**
**हे सर्व ऐकून मी शॉक झाले, आता पीरा गावच्याच तुरुंगात होती...**
**मी व सावित्री तिला भेटायला गेलो, मला बघून ती हरखून गेली.. आपले खरबरीत हात माझ्या गालावरून फिरवत होती,**
**माझे मात्र डोळे गच्च भरले होते,**
**"रडू नका टून्नू बाय, मी येईन बाहीर, तस ही आता माज काय उरलंय..? हीच लगीन झालं, पोरग गेलं त्याच्या गुणाने, नवरा पण सुकात हाय हिच्याकडे"**
**मग माझी हाड इथं पडली काय, बाहेर पडली काय.. सार सारकच"**
**मला बोलायलाच येईना,**
**"अग पण.."**
**"जे झालं ते बेस झालं, नाई तरी मरणारच होता त्यो, अफू खाऊन खाऊन माझा जीव घ्यायचा दररोज, पहिले नवरा मारायचा, आता पोरग मारायचं, कटाळून गेला होता जीव माझा"**
**"आणि बघा बाय, बाई जनमभर आपल्या इज्जतीला जपती, आणि तो भाड्या स्वतःच्या बहिणीच्या अब्रूवर पैसे कमवायच बगत होता, मला सहन नाही झाले ते, घेतला कोयता व कापली मान, जनम दिला मीच व मीच जीव बी घेतला."**
**तिचा निरोप घेवून निघालो तेंव्हा सूर्य मावळतीला जात होता, आपल्या रंगबिरंगी छटानी आकाश भरले होते तो लालभडक गोळा क्षितीजाच्या पल्याड जात होता व मला डोळ्यासमोर कोयता घेवून स्वरक्षणासाठी व मुलींसाठी उभी टाकलेली पीरा दिसत होती.....**

*(ना संपणार तुझे अस्तिव, ना तू विरळ होणार, तुझवाचून हे विश्व आपूले, किती काळ टिकणार ?)*

# मारिका वेर्वोत

मंदार पत्की

आपण इतिहासात अनेक शौर्याच्या आणि एक से एक नायक महानायिकेच्या गोष्टी ऐकल्या आहेत. आपली नायिका मारिकापण शौर्य, साहस, चिकाटी, जिद्द आणि अजुन जे काही विशेषण लावता येतील ते सर्व काही या लढवय्यी मारिकामध्ये होतं.

सर्व सामान्य आयुष्य जगत असताना वयाच्या 14 वर्षी "रिफ्लेक्स सिम्पोथेटीक डिस्ट्रोफी" या आजाराने ग्रासलं आणि सारं आयुष्यच पालटून गेलं. यामूळे स्नायूंमध्ये आणि मणक्यात अतिक्षय प्रचंड दुखायला लागलं आणि हळू हळू साधारण आयुष्य जगण्यात असंख्य बाधा निर्माण झाल्या आणि एकप्रकारे अपंगत्व यायला सुरूवात झाली. दुर्देवाने हा आजार वाढत गेला आणि एक दिवस मारिकावर व्हिल चेअर वापरण्याची वेळ आली.

पण मारिका ही काही साधी सुधी सामान्य मनुष्य नव्हती. तिने त्या परिस्थितीत स्काय डायविंग आणि बंजी जंपीग केले. काय अफाट इच्छाशक्ती असेल. कमाल आहे! लहानपणापासून अॅथलेक्टीसमध्ये विशेष आवड होती. या आवडीने तिला फार काळ काही स्वस्थ बसू दिले नाही आणि व्हिलचेअर रेसिंग या क्रिडा प्रकाराला तिने आत्मसात केले. मारिकाने एकदा असे म्हणले आहे -

"व्हिलचेअर रेसच्या सुरूवातीला जेव्हा स्टार्टींगलाईनवर वाट पाहत असतो तेव्हा पूर्ण अंगात जो काही थरार संचारतो त्यासमोर या जगात माझ्यासाठी कशाचीच तोड नाही आणि माझ्या छातीचे जणू बूम.. बूम.. बूम.. असे ठोके वाजू लागतात आणि जेव्हा 'गेट सेट गो' असं म्हटलं जातं तेव्हा मी माझ्या शरीरातील सर्व बळ फक्त चाकांना पुढे रेटण्यासाठी केंद्रीत

करते, त्यावेळेस मी माझी चीड, माझं दुःख सर्व काही विसरून फक्त एका ध्येयाकडे वाटचाल करते."

मारिकाने यशाचे पहिले शिखर गाठले ते 2012 लंडन पॅराऑलिम्पिकमध्ये. व्हिल चेअर रेस खेळ प्रकारात 200 मीटर शर्यतीत रजत पदक आणि 100 मीटर शर्यतीत सुवर्ण पदक पटकावले.

पुढे 2016 साली रिओ पॅरा ऑलिम्पिक गेम्समध्ये रजत आणि कास्य पदके पटकावली पण हे वाटतं होतं तितकं सोपं नव्हतं. कित्येकदा तिला ट्रेनिंगच्या दरम्यान हाॅस्पिटलमध्ये भरती व्हावं लागायचं पण मारिका म्हणते -

"रिओमध्ये पदक मिळवणे हे मी माझ्यासमोर एक ध्येय ठरवले होते आणि ते मिळवण्यासाठी मी काहीही सहन करायला मागे-पुढे पाहीले नाही"

तिच्या या लढ्यात तिच्यासोबत सदैव साथ देणारी तिची कुत्री "झेन". झेन ना केवळ तिची 24 तास काळजी घ्यायची पण ती एकप्रकारे मारिकाची मैत्रिणीच होती जणू. "झेन" म्हणजे शांतता, स्थिरता. नावाप्रमाणेच झेन जवळ असताना मारिकाला एकप्रकारे मानसिक शांतता वाटायची. झेनबद्दल मारिका म्हणते-

"झेन ही माझ्या आयुष्यातील घडलेली सर्वात चांगली गोष्ट, ती माझ्या आयुष्यात यायच्याआधी माझं जीवन अतिक्षय खडतर आणि कष्टप्रद होते. झेनने कधीही मला जे जमणार नाही अशी अपेक्षा केली नाही उलट तिने वेळोवेळी माझ्या दैनंदिन कामांमध्ये माझी फार मोलाची मदत केली. जसे माझे मोजे, जॅकेट खाली पडलेले असतील तर ते उचलून देणे, मी जर बेशुद्ध पडले असेल तर जोरजोरात भुंकणे जोपर्यंत कोणी मदतीला नाही येणार. इतकंच काय, मला अपस्माराचा झटका येणार असेल तर झेनला ते जवळपास 1 तास आधीच लक्ष्यात यायचं आणि ती माझ्या अवतीभोवती फिरायची आणि मला एकटे सोडून बिलकुल हलायची नाही."

अशाप्रकारे झेन आणि अतिक्षय वैद्यकीय इलाजाच्या जोरावर मारिकाने इतक्या प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा आपले ध्येय साध्य केले.

पण मारिकाने 2008 सालीचं आपल्या इच्छा मरणाच्या करारावर सही करून ठेवली होती. ती म्हणाली, ज्यादिवशी मला दुःख असह्य होईल त्यादिवशी मी मरण स्विकारेल. अंतत: पॅराऑलिम्पिक स्पर्धेतील पदक विजेती मारिका वेर्वोत हिने वयाच्या अवघ्या चाळीसव्या वर्षी 22 ऑक्टोबर 2019 ला इच्छा मरण पत्करले.

मारिका आपल्यामागे जिद्द, चिकाटी आणि लढवय्येपणाचा फारमोठा वारसा ठेऊन गेली, जी येणार्या कित्येक पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल.



# " तिच्यातली हरवलेली ती "

अरुणा धनंजय विचारे-7038278271

त्याच अचानक जग सोडून जाणं जरा खटकलं,
पण त्यातचं त्या बाईचं बाई पण हरपलं,

तिच्या सौदर्याचा संबंध फक्त तिच्या कुंकवाशी होता,
त्यानं जाताना याचा कुठे विचार केला होता.

वखवखलेल्या नजरा आता तिला बोचत आहेत,
बाई आता जगण्याचा आधार शोधत आहे,

तिच्यातल्या तिने कधीच चितेत उडी घेतली,
पण मुलाच्या भुकेल्या नजरेने जगण्याची उमेद भेटली,

पण मनाचं काय ते कुठे गुंतवाव,
स्वतः च्या आवडली आता बुडवाव,

अनेकदा मनात आलं तू कोण आणि स्त्रित्व कुणासाठी,
तिचा दुःख आणि त्रास तिच्यापाठी,

तिची कुचंबणा तिलाच जाळते आहे,
तिच्याल्या तिला मारते आहे,

माझ्यातलं जगणं त्याच्या बरोबर गेलं,
फक्तं मारायचा वाटा मागे सोडून गेलं,

कणव करणारे आता टोचत आहेत,
त्याला गमवल्याच बोच देत आहेत,

एका विधवेला यापेक्षा नरक कुठे दिसेल का,
कधी आनंदची झालर तिला मिळेल का?

# Maintenance

अर्चना गवस चौधरी- archanagawas20079@gmail.com

"अग, काय ग तुझी गाडी servicing ला आली तरी तु आपली चालवतेच आहे"

बायकोची गाडी कधी वापरली की प्रत्येक नवऱ्याची हीच तक्रार असते. 90% बायका हे वाचून मान डोलावतील पण नुसतं मान डोलवू नका... किंवा "अय्या खरंच!!!" असेही म्हणू नका जरा विचार करा असं का होतं? आणि हे फक्त गाडी बाबतीत आहे का? असाही विचार करा...

मला वाटत हे गाडी बाबतीत नाही तर आपल्या आरोग्याबाबतीत पण असंच आहे ...थोडं पोटात दुखलं.. ओव्याने शेकलं... वजन वाढलं तर मुलं झाली, हार्मोनल imbalance म्हणून टाळून दिलं... डोकं दुखलं, रक्तस्त्राव, चक्कर, एक ना हजार गोष्टी ...फक्त टाळत जायच्या...इतक्या टाळायच्या की आपली आरोग्यव्यवस्था बंद पडायची वेळ येते...

आजूबाजूला अनेक मैत्रिणी, त्यांच्या आई, त्याच्या नातलग स्त्रिया सगळ्या जणी ह्यातून जात आहे... मैत्रिणीच्या आईला viral होतो काय आणि त्यातून त्या GB sydrome च्या शिकार काय होतात. (https://medlineplus.gov/ency/article/000684.htm) आणि त्या आणि घरचे सगळेच जण हतबल होतात... Anemia, PCOD, thyroid तर धडधाकट असल्याची निशाणी असल्यासारखं स्त्रिया वागायला लागल्या आहेत...का होत हे सगळं...का आपल्याला आपलीच काळजी नाही... साधं सर्दी पडसे जरी झाले मुलांना किंवा नवऱ्याला तरी जीवाचं रान करतात बाया पण स्वतः च्या बाबतीत अश्या उदासीन का? कदाचित मी आजारी पडली तर बाकीच्यांचे किती हाल होतील? माझ्याशिवाय कोण करेल? असे प्रश्न आणि मला काही होणारच नाही असे काही समज तर नाही ना आपल्याला मनात ...पण हे प्रश्न किंवा समज कसलेही उत्तर नाही

**अहो हातात धरलेला मोबाइल सुद्धा charge नाही केला तर बंद पडतो मग आपल्याला चार्जिंग ची गरज नाही असा समज का? व्यायामाला वेळ नाही...जेवायला वेळ नाही... स्वतः कडे बघायला वेळ नाही मग असाध्य आजाराला तुमच्याकडे यायला वेळ लागणार नाही.**

**आपल्या सगळ्यांना आत्मचिंतनाची गरज आहे... वेळ कशालाच नसतो तो काढावा लागतो... सकाळी उठल्यावर एक फळ खा... ओट्याच्या बाजूलाच ठेवा...काम करता करता खा....चहा पिता पिता थोडे कुरमुरे खा... पोळ्या करताना एक पोळी जास्त करा..चहा पिताना गुळ लावून पोळी खा... थोडे फुटाणे खा... साध्या साध्या गोष्टी करायला वेळ नाही काढावा लागत... एखादी serial बघत असाल तर ad बघताना मान इकडे तिकडे वळवा... तळपाय गोल गोल फिरवा...आपली दोन्ही हातांची नख एकमेकांवर घासा... डाव्या हाताच्या अंगठ्याने दुसऱ्या अंगठ्याच्या खालचा तळहात दाबा.... सगळ्या मैत्रिणीबरोबर सकाळी फिरायला जा...हो मुलांनाही घेऊन जा...त्यांना पण सवय लागु द्या...(बघा ह...नाहीतर मुलांची तब्येत खराब होईल व्यायामशिवाय...ह्या बागुलबुवा साठी तरी बाहेर पडा).... वर्षांतून एकदा तरी body checkup करा... त्यात सगळ्या चाचण्या चांगल्या निघाल्या तर आनंद माना... पैसे वाया गेले काहीच निघाले नाही म्हणून दुःख करू नका...वजन अचानक वाढलं अथवा कमी झालं तर डॉक्टर चा सल्ला घ्या... एकीला एका डाएट plan चा फायदा झाला म्हणजे आपल्याला तोच plan चालेल असं नाही होत..वय , अंगकाठी आणि अनेक गोष्टी कारणीभूत असतात...**

**एकंदरीत माझं म्हणणं एवढंच आहे...चला, आपल्या maintaince कडे आपणच लक्ष देऊया... छोट्या छोट्या गोष्टीत आनंद मिळतो ना आपल्याला तसेच आपल्या छोट्या छोट्या गोष्टीची काळजी घेऊया आणि म्हणजे मोठया मोठया गोष्टींची काळजी घ्यायला समर्थ होऊया....**

# नवी सुरूवात

अजय चव्हाण - ajayrchavan90@gmail.com

पलीकडे मसाणवट्यात प्रेत जळत होतं. लाकड्यांच्या त्या ढिगांतून प्रेताचा अस्पष्ट चेहरा अर्धवट जळालेल्या मानेमुळे खालच्या बाजूला थोडा झुकला होता. हारतुरे आणि कोरं करकरीत शुभ्र कफन केव्हाच जळून काळपट भासतं होतं. अग्निज्वाळाच्या उसळीतून काळा धुर हलकेच वर येऊन वातावरणात पसरू पाहत होता. त्या धुरांबरोबर एक प्रकारचा तीव्र वास चहूबाजूला पसरून आपलं नव्याने उदयास आलेलं अस्तित्व दाखवून देत होता. आजूबाजूला जमलेली माणसं नाकातोंडाला रूमाल लावून मूकपणे थोडसं दुर निमूटपणे वाट पाहत उभी होती. तेवढ्यात पुढे असलेल्या म्हातार्या तात्यानं थोडसं रॉकेल शय्येवर झिडकारलं तशा अग्निज्वाळा आणखीनच उग्र होऊन वर वर उसळी मारत होत्या. जास्तीच्या पेट घेतलेल्या ज्वाळांमूळे वरच्या थरावर लावलेल्या कोवळया काटकुळयांचा जळतानाचा "कड् कड्" असा बारीकसा आवाज येत होता. एकाएकी ज्वाळांची गती वाढीस लागली. लाल-भडक, केशरी अशा त्या ज्वाळा जलद गतीने पसरू लागल्या. चेहर्यापर्यंत पसरलेल्या ज्वाळांमधून चेहर्यावरची कातडी वितळू लागली. हळूहळू संपूर्ण कातडी वितळून फक्त कवटी तेवढी शिल्लक राहीली. गरम भट्टीत लोखंड तापावं तसं कवटी आता तापू लागली. पांढरी, कळपटं,थोडीशी लालसर कवटी त्या आगीत धगधगत होती. आगीच्या वाढत्या दाबाने कवटीला तडे जाऊ लागले आणि एका क्षणात "फाट्sss" असा जोराचा आवाज येऊन कवटी फुटली. कवटी फुटली आणि सगळ्यांनीच निश्वास सोडला.

जमलेली लोक शेवटचा नमस्कार करून उद्विग्न मनाने हळूहळू चालत गावात परतू लागली.

गावातल्या एका अरूंदशा वाटेवर डाव्या बाजूला कडूलिंबाचं झाडं होतं आणि त्याच झाडाच्यापल्ल्याड असलेल्या झोपडीत आज शोककळा पसरली होती. झोपडीत फारशी जागा नसल्याने लिंबाखाली माणसं जमा झालेली. झोपडीत आणि झोपडीबाहेर बाया जमल्या होत्या. झोपडीतल्या एका कोपर्यात "रज्जू" पाय दुमडून बसली होती. रडून रडून डोळ्यांतलं पाणी केव्हाचं आठलं होतं. आता नुसतेच सुकलेल्या ओठांतून सुके हुंदके दाटून येत होते. डोकं जडं होऊ लागलं होतं. मेंदूला झिणझिण्या येत

होत्या. मनात येणारे असंख्य विचार थांबता थांबत नव्हते. तिच्या नशिबाचे भोग संपता संपत नव्हते. नवरा गेल्याच्या दुःखापेक्षा तिला भविष्याची चिंता सतावत होती. पदरात दोन मुली. त्यातली एक जन्मतः आंधळी. नवरा होता तो फक्त तो नावालाच.

नपुसंक साला! बाईलवेडे चाळे करायचा. गावभर हिंडण आणि कुठल्यातरी दारूड्याखाली झोपणं इतकंच काय त्याचं कर्तृत्व.
पदरात दोन मुली दिराकडून झालेल्या. दिर समजूतदार होता पण त्याखाली झोपणं म्हणजे..? पण काय करणार रोजची "त्या"साठी होणारी मारहाण आणि शरीराची भूक सहन होईना म्हणून कशीबशी तयार झालेली. दिराच मन भरलं तसा तोही निघून गेला मुंबईला. शिकून मोठा ऑफिसर झाला म्हणे. ह्या पाच वर्षात कधी फिरकलाच नाही. ना त्याचा ठाव ना ठिकाणा. नवरा कसाही होता तरी कुंकवाचा धनी होता आणि कसंबसं घर तरी चालवत होता.
आता कुणाकडे पाहायचं?? विचारांच्या गर्दीत "रज्जू" हरवत चालली होती. कसलं हे आयुष्य आणि कुठे घेऊन जाणार आहे हे फक्त परमेश्वरालाच ठाऊक.

हळूहळू जमलेली माणसं पांगू लागली. इतकावेळ माणसं जमली होती म्हणून थोडा दिलासा मिळालेला. आता ही रात्र नुसतीच भकास आणि उदास वाटतं होती. शेजारची पारू बेसन आणि चार भाकर्या देऊन गेलेली. खायची इच्छा जरी नसली तरी काहीतरी ढकलावं लागणारचं होतं. दोन्ही पोरींना खायला घालून कशीबशी तिने अर्धी भाकर खाल्ली आणि नुसतीच जमिनीवर पडून राहीली.
पोरी लगेचच झोपल्या. पडलेल्या आढ्याकडे एकटक बघत पुन्हा ती विचारगर्तेत हरवत चालली होती आणि ह्याच विचारात कधी थकून तिचा डोळा लागला हे तिचं तिलादेखिल कळलं नाही.

पंधरा दिवस असेच लोटले. पंधरा दिवसासाठी का होईना गावाने तिला सांभाळून घेतलं. घरात अन्नाचा कण नसताना ती उपाशी राहीली नव्हती. नातेवाईक काय, शेजारी काय किंवा संपूर्ण गावं काय? किती दिवस करणार होते? आयुष्याचा मार्ग तिलाच काढावा लागणार होता. हे बोजड आयुष्य फेकून द्याव त्या वेशीवरच्या विहीरीच्या खोल डोहात.. असं कितींदा तरी वाटलं असलं तरी मुलींसाठी का होईना जगावं तर लागणारचं होतं.
सकाळच सगळं आटपून दोन्ही मुलींना पारूकडे सोपवून "रज्जू" कामाच्या शोधात निघाली.

दिवसभर हिंडूनही कुठलचं काम हाती लागलं नव्हतं. पार तालुक्यातदेखिल जाऊन आलती. तालुक्यातल्या बाजारात जात असताना शाळेतला "म्हादया" भेटला. करतो काहीतरी बोलला. तेवढीच काय ती आशा. रात्री परतताना तालुक्याच्या मुख्य रस्त्याच्या कडेला अस्पष्ट उजेडात रांडा उभ्या असलेल्या दिसल्या.
त्यांना पाहून सरकन काटाच आला अंगावर. काही नाही मिळालं तर हेच करावं लागेल बहुदा ह्या विचारानेच तिला शिरिशिरी आली. कसलं शीलं आणि कसलं आलयं पावित्र्य पोटासाठी सगळचं माफ आणि कुर्बान. त्यांच्यात नि माझ्यात काय फरक आहे? मी तरी काय केल? दिरासोबत...?? नुसत्या त्या आठवणीनेच हुंदका आला तिला. कसंबसं भराभर चालतं तिने झोपडी गाठली.

आठवडा झाला. सरपंचाच्या ओळखीने आंधळ्या पोरीला बाफना स्कूलमध्ये टाकलं. राहायचं, खायचं , शिकायचं सगळचं संस्था पाहणार होती. धाकटीला पण तालुक्यात कन्या आश्रमात टाकलं. थोडा भार हलका झाला. नक्की भार हलका झाला होता?
नाही! अजून वाढला होता. ह्याबदल्यात सरपंचाने पुरेपुर किंमत वसूल केली होती. सगळेच साल्ले हपापलेले लांडगे..

गावात परत म्हाद्या भेटलेला. एक काम हाय म्हटला पण काय काम आहे सांगाया तयारच नव्हत बेणं. उद्या तालुक्याला सरकारी हास्पिटलात भेट असं सांगून निरोप घेतला. आज पाटलाकडे कापणी केलती. कंबरडं पार मोडून गेलेतं. त्या वेदनेसमवेत रज्जू तशीच  झोपी गेली

हाॅस्पिटलमध्ये एका बाकड्यावर रज्जू मुकाट बसली होती. येणारे जाणारे बाॅर्डबाॅय तिच्या पदराआड बघण्याचा प्रयत्न करायचे. अशा नजरा तिने कित्येकदा झेलल्या होत्या. सवयीने तिने पदर सारखा केला नि हाताची घडी घालून शांत बसून राहीली.
मनात येणार्या असंख्य विचाराने काहूर माजलेलं. घड्याळाचे काटे आपल्या वेगाने सरकत होते. हळूहळू वेळ जरी सरकत असली तरी मनातले विचार आणि प्रश्न काही सरत नव्हते.

"साहेबांनी तुला आत बोलावलय"

म्हाद्याचा आवाज कानी पडला तशी ती भानावर आली. उठून तिने चोळामोळा झालेली साडी व्यवस्थित केली आणि म्हाद्याबरोबर आतमध्ये गेली.

साहेबांनी काही जुजबी प्रश्न विचारले. तिच्या उत्तरांनी साहेबांना एकंदरीत तिची परिस्थिती आणि गरज दोन्ही लक्षात आल्या पण ज्या कामासाठी तिची मुलाखात होतेय ते काम ती करू शकेल याची बहुदा त्यांना खात्री नव्हती पण म्हाद्यानी केलेली विनंती आणि तिची गरज दोन्ही गोष्टी लक्षात घेता काम तर तिला मिळायला हवं  पण असलं काम? साहेब स्वतःशीच काहीतरी विचार करत होते इतक्यातच -

"सायब कणचं काम हाय? म्हणजे म्या बगा लादी, कपडे, भांडी वा असली समदी समदी काम करायला रेडी हाय"

हाती येत असलेलं काम जाऊ नये म्हणून हुशारीने रज्जूने विचारलं आणि त्यातूनच कुठलही काम ती करू शकते हे दर्शवलं.

साहेबांनी एक कटाक्ष तिच्याकडे टाकला आणि चाचरतच विचारलं

"प्रेतांची चिरफाड करशील?"

साहेबांच्या ह्या अनपेक्षित प्रश्नांने रज्जू अवाक झाली. क्षणभर तिच्या मनाची घालमेल झाली. नुसतं रक्त पाहून तिला शिशारी यायची. कधी कधी तर उघड्या जखमा पाहील्या तरी तिला उलट्या व्हायच्या पण शिशारी काय किंवा उलट्या काय? तोंड आणि पोट साबूत असल्याशिवाय येणार नाहीत आणि म्हणूनच चेहर्यावर कोणतेच भाव किंवा भिती आणू न देता तिने होकार दिला. साहेबांच्या मेहरबानीमुळे डीग्री किंवा कुठलाही डिप्लोमा नसताना तिची नियुक्ती करण्यात आली. प्राथमिक प्रशिक्षण आणि काही दिवसांच्या सरावांनी ती कामावर रूजू झाली.

**पहिल्यांदा चिरफाड करताना प्रचंड भिती नि किळस वाटलेली पण निर्जीव देहाचं पोट समोर पाहिल्यावर तिला तिचं आणि तिच्या पोरीचं पोट आठवायचं मग येणारी शिशारी, भीती, किळस किंवा  मनात उमटणार्या अशाच भावना दुर सारत ती पोटं फाडायची आयुष्याच्या ह्या रहाटगाडग्यात कुणाचं तरी पोट फाडून ती तिचं पोट भरतं होती. जिथे कुणाचं तरी आयुष्य संपत तिथे तिने आयुष्याची नवी सुरूवात केली होत**



# प्रेताकल्प

*अज्ञातवासी*

कडक उन्हात एस टी फाट्यावर थांबली. उन्हाचा पारा चांगलाच वर होता. अंगाची लाहीलाही होत होती.

सोनाली वैतागाने खाली उतरली. तिने स्कार्फ गच्च आवळून बांधला.

'तार तर केली होती, काका अजून कसा आला नाही?,' तिने मनाशीच विचार केला.

फाट्यापासून दोन किलोमीटरवर गाव होतं. सोनालीच घराणं गावातील मोठं प्रस्थ. सोनालीचे बाबा सरपंच होते. घरातील तीन सदस्य ग्रामपंचायतीत होते. शेकडो एकर शेती होती. गुरे ढोरे यांची ददात नव्हती. घरातच बेचाळीस माणसे होती.

...पण या घराण्यात शिकली फक्त सोनाली... सर्वांची लाडकी.

सोनाली विचार करतच उभी राहिली, तेवढयात तिला आजी दिसली.

आज्जी..... तिने जोरात हाक मारली.

आजी... नामुआजी!!!!

तरातरा चालत ती सोनालीजवळ आली.

"आलीस होय? केव्हाची वाट बघत होते."

"आले, पण तू इथे काय करतेय?"

"मीही आधीच्या गाडीने आले, श्रीहरी तुला घ्यायला येणार म्हणून थांबले."

"अजून आला कसा नाही?" सोनाली विचारात पडली.

आजी थोड्या वेळ घुटमळली.

"मरू दे, चालतच जाऊ चल. दोन किलोमीटर तर आहे."

सोनालीनेही मान हलवली.

दोघी चालू लागल्या. तशी रस्त्यावर दुतर्फा झाडी होती, त्यामुळे चालणाऱ्याला हायसं वाटत होतं.

"सोनाली, किती दिवस झाले भेटली नाहीस मला."

"काय आजी, मागच्याच महिन्यात आले होते ना?"
"बरं, पण कामाच्या गडबडीत राहून जातं बोलणं. आता ऊस जातोय कारखान्यावर, कामच वाढलंय... मी मेली कुठेकुठे पुरणार."
"तूच सगळं करावं असं थोडीच आहे?" सोनाली हसली.
"मग कोण करणार? तुमच्या आया घर सोडत नाही. मजूर आले तर त्यांच्या जेवणखाण्यापासून सगळं बघावं लागत. माणसं कुठेकुठे पुरणार. त्यात तुझ्या काकांची नजर वाईट. मजूर बाईच्या कुणी नादी लागला म्हणजे?"
सोनालीला मागच्याच वर्षीचा किस्सा आठवला, एका मजूर मुलीने गर्भार राहिली म्हणून नदीत जीव दिला होता.
"आजी, असं का बोलतेय?" तिने चमकून विचारलं.
"मोठी झालीये पोरी तू आता. ही बघ आली संगमी..."
सोनालीने संगमी नदीकडे बघितलं. मोठं विस्तीर्ण पात्र आता आटलं होतं. तीन नद्यांचा संगम म्हणून नाव संगमी.
"राधीने इथेच जीव दिला ग. डोळ्याला डोळा नव्हता चार दिवस. तरुण पोरं, अवखळ. साडीतसुद्धा आली नव्हती."
"लोकही किती नीच असतात ना आजी." सोनाली हताश होऊन म्हणाली.
"आपल्याच घरातली कीड. तुझा काका, गजानन..."
"आजी काय बोलतेय..." सोनालीला शॉक बसला.
"खरं तेच बोलतेय. तुझ्या घरातलं तुला माहिती पाहिजे. तुझ्या काकाचाच हा प्रताप. त्यानेच मारलं तिला."
आजी थोडावेळ गप्प बसली.
"मी गेल्यानंतर त्याला सोडू नको... त्याला शिक्षा दे, त्याशिवाय माझा आत्मा थंड व्हायचा नाही."
सोनाली सुन्नच झाली.
"थांब..." आजी अचानक म्हणाली.
काय झालं.

आजीने एका जागी वाकून नमस्कार केला. समोर एक शेंदूर लावलेला दगड होता.
"हा रांबाईचा म्हसोबा. अग या म्हसोबाची शपथ घेऊन किती पापे लपली असतील गणती नाही..."
"म्हणजे????"
"तुझा आजा, यशवंतराव थोरात. माणूस खूप मोठा ग, खूप मोठा... पण बाहेरच्यासाठी. घरात हैवान. बाया म्हणजे त्याला पायताण. कशाही बाया भोगायचा. त्याला सीमा नव्हती ग. रात्र झाली की सैतान जागा व्हायचा त्याच्यातला."
"आजी..."सोनालीला कसनुस होत होतं.
थोरातांची लेक म्हणून मिरवते ना? मग पापही ऐकायला शिक...अजूनही आठवत ग मला... एकदा एका रात्रीत मायलेकी भोगल्या तुझ्या आज्याने. बलात्कार केला म्हण ना. कोपऱ्यात बसून रात्रभर रडत होत्या. पोरगी दुसऱ्या दिवशी तापाने फणफणली आणि सहाव्या दिवशीच गेली. बाईने न राहवून गावकीत फिर्याद केली, तर म्हसोबाची शपथ घेऊन तुझा आजा नाही म्हटला. बाई शेवटी म्हसोबासमोर डोकं आपटून गेली."
सोनालीला घरी कधी पोहोचते असं झालं होतं. दोघी-जणी झपाझप पावले टाकत होत्या. आजी इकडच्या तिकडच्या गप्पा मारत होती.
एक जुनाट वडाच्या झाडासमोर आजी पुन्हा थांबली. झाडाच्या मागेच एक पडकी भिंत होती. आजीने वडाला नमस्कार केला.
"सोनाली, नमस्कार कर..."
तिनेही गडबडून नमस्कार केला.
"फाश्या वड. या वडावर कित्येक लोकांनी फाशी घेतली असेल, गणना नाही. तुझ्या आज्याने पण बरेच जीव घेतले, आणि शेवटी इथेच फास लावून मेला."
"का आजी?"
"पोटची पोर गेली बाईची. रात्रभर तुझ्या आज्याला त्रास द्यायची. रात्री विहिरीत, परसाकडे सगळीकडे दिसायची. सहन नाही झालं आज्याला आणि दिला जीव."
गाव अजून १ किलोमीटरवर होतं. वखारीजवळ दोघीजणी पोहोचल्या.

"बघ वखार. तुझा बाप शिकून आला, आणि ही वखार काढली. बक्कळ पैसा. अनेक व्यवसाय केले थोरातांनी, पण वखार म्हणजे स्यमंतक मणी...पैसा कधी आटला नाही.
...सोने, बापाला नीट शिकव तुझ्या. काका वखारीवर हात मारतायेत. कर्ज काढताय तुझ्या बापाच्या नावावर. असंच चालू राहील तर बापाला नागवतील तुझ्या."
"आजी... तुझीच मुले आहेत सगळी."
"पोटापुढे खोट्याच खर होतं नसतं सोनी. सगळे बोचकारतायेत वाड्याला. बडा घर पोकळ वासा अशी गत झालीये."
सोनाली आज थक्कच झाकी होती. शिकतोय शहरात याचा तिला अभिमान होता. पण घरातल्या कशाचीही तिला जाणीव नाही, याची शरमही वाटत होती.
"आजी... आजच सगळं का बोलतेय ग?"
"मग, सगळं लटांबर असतं वाड्यावर. मला मेलीला वेळ नसतो. तू एकटी सापडणं मुश्किल. कधी बोलणार या गोष्टी?"
"मी बसेन आता तुझ्याजवळ."
"वेळ नाही मिळणार ग पुन्हा. थांब जरा. ही इमारत बघितलीस? नसीमची कोठी..."
इमारतीत बरीच वर्दळ होती. इमारत बरीच मोठी होती. अनेक मजली होती. अनेक खोल्या होत्या, खाली दुकाने होती.
"नसीम पक्की धंदेवाली बाई, पण तिची मुलगी सकिना म्हणजे रूपाची खाण... बाप कोण माहिती नाही, पण सकिनाकडे कुणाची बघायची टाप नव्हती. तुझा सगळ्यात मोठा काका माहितीये ना?"
"हो महादेव काका..."
"ऐक. सगळ्यात मोठा होता शरद. मोठा गुणी होता ग... शाळेत हुशार.... मात्र शाळेतच त्याचा सकिनावर जीव जडला, आणि...
काय आजी... सोनालीच्या थरकाप झाला.
भर पावसाचे दिवस होते. संगमी काळीज फाडून वाहत होती. तिथेच दोघांनी हातात हात घेऊन जीव दिला."
सोनालीला काय बोलावं तेच सुचेना.

"दोघांचं प्रेत कुठे वाहून गेलं, थांगपत्ता लागला नाही. नसीम वेडी झाली. तिच्या लोकांनी तिला सांभाळलं. आणि माझ्या लोकांनी शरद आणि सकिनाला..."

"म्हणजे आजी?" सोनालीला आता वेड लागायची पाळी आली होती.

"डॉक्टर गंधे. आपल्या गावात सरकारी डॉक्टर होते, नंतर शहरात गेले. तुझा आजा शरद आणि सकिनाचा जीव घेणार होता... सैतान होता तो. म्हणून हे नाटक रचलं. शरद थोरात नावाचा एक मोठा ह्रदयविकारतज्ञ आहे मुंबईला. तोच तुझा शरदकाका. तुझ्या काकांना वाटत, म्हातारी बरंच दडपून बसलीय. एक सांगते. माझ्याकडे दमडी नाही, सगळं शरदसाठी पुरवलं. तुझ्या बापाला सांग, जाऊन भेट त्याला, आणि भाऊ व्हा एकत्र."

"आजी... काय काय लपवलय ग तू? वेड लागेल मला आता." सोनाली म्हणाली.

दूरवर वाडा दिसत होता. वाडा जवळ येत होता.

"बरं शेवटचं ऐक आता. लक्ष देऊन. "

सोनालीने फक्त मान हलवली.

"तुझा आणखी एक काका होता. शांताराम नावाचा."आजीचा आवाज घोगरा झाला.

"त्याचं काय?"

"लहानपणीच तो बेपत्ता झाला." आजीच्या आवाजात आता विलक्षण कोरडेपणा आला होता.

"आजी पुढे काय?'सोनाली ओरडलीच.

"एका बाईचे एका डॉक्टरबरोबर संबंध होते, आणि शांतारामाने ते बघितलं. तो वाच्यता करू नये म्हणून त्या बाईने त्याला मारलं."

"कोण होती ती बाई....आजी?????"

"तुझ्या बापाला सांग सोनी, वाड्याच्या उजव्या बाजूच्या गोठ्यात म्हशीच्या कोपऱ्याजवळ खणून काढ. सांगाडा झाला असेल, विधिवत विसर्जित करायला लाव."

"आजी कोण होती ती बाई?"

"मी......!!!!!"

सोनालीला भोवळ आली, अचानक सगळं जग तिच्याभोवती फिरतय असा तिला भास झाला. संगमी, राधा, म्हसोबा, वड, आजा, शरद, सकिना...

...शांताराम...

ती शुद्धीवर आली.  तिच्या उशाशी बाबा बसले होते. घरात रडारड चालू होती.
"सोनाली, बरं वाटतंय ना."आई अजूनही रडत होती.
"आजी... "सोनालीने क्षीण स्वरात विचारले...
"सकाळीच गेली ग, तुझी खूप आठवण काढत होती." आई रडतच म्हणाली.
...सोनाली पुन्हा बेशुद्ध पडली.





# मुलाखत!

*सौ.भाग्यश्री कुलकर्णी*

**वय वर्ष ५० च्या नंतर मार्केटिंग या क्षेत्रात ज्यांनी डॉक्टरेट मिळवली आहे अशा सौ.भाग्यश्री कुलकर्णी यांच्याशी केलेली ही खास बातचीत!**

**नमस्कार! सर्वप्रथम वाणिज्य सारख्या अवघड शाखेतून डॉक्टरेट मिळवल्याबद्दल तुमचे हार्दिक अभिनंदन! तुमच्या डॉक्टरेट मिळवण्याच्या प्रवासाविषयी काय सांगाल?**

खरं सांगायला गेलं तर हा प्रवास आवश्यकच होता, कारण नियमानुसार प्राध्यापकाने सेट आणि पीएचडी या परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. त्या मुळे ह्या प्रवासाला फेब्रुवारी २०१६ ला मी सुरुवात केली. पेट १, पेट २ आणि viva या तीन खडतर आवश्यक पायऱ्या पहिल्या झटक्यात पार करून माझ्या विषयनिवड या महत्त्वाच्या टप्प्यापाशी आले. वाणिज्य आणि व्यवस्थापन या विषयातील विपणन हा अभ्यास विषय घ्यायचा होता. कारण माझ्या M.com. चा विशेष विषय तोच होता. मग Home appliance म्हणजेच ग्रूहोपयोगी इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिक वस्तू यांच्या संदर्भात विपणन आणि विक्रीपद्धती आणि उपभोक्ता आणि त्यांचे वर्तन असा विषय सापडला; आणि हा तीन वर्षाचा प्रवास सुरू झाला. ह्या प्रवासाने मला संशोधनाचे आयाम प्राप्त झाले. लोकांच्या आवडीनिवडी विषयी बरंच काही

जाणून घ्यायला मिळालं, आणि 400 लोकांच्या निर्णय प्रक्रियेचे विश्लेषण करता आले, याचे समाधान आहे. आता हा विषय मुलांना आपण अजून चांगल्या रितीने शिकवू शकू, असा विश्वासही प्राप्त झाला.

**वाणिज्य शाखेतले बरेचसे जण बँकेत किंवा एखाद्या कंपनीत अकाउंटंट म्हणून कार्यरत होतात. मग तुम्हाला शिक्षण पेशा का निवडावासा वाटला?**

लहानपणापासूनच आमच्या घरात शिक्षकी पेशाचे वातावरण होते. माझे आई-बाबा दोघेही शिक्षक होते, त्यामुळे लहानपणापासूनच माझ्यावर ते संस्कार झाले. दुसरी गोष्ट म्हणजे, या पेशाची मला मुळापासून आवडसुद्धा होती. मी बारावीला असताना दहावीच्या मुलांचे क्लासेस घेतले आहेत, त्यामुळे हा पेशा निवडला.

**घर - नोकरी - विद्यावाचस्पतीचे काम.... सारं एकत्रपणे कसं साधलंत?**

कामांचं वेळीच नियोजन करून आणि आखणी करून. विद्यावाचस्पती म्हणजे Phd करताना एक महत्त्वाच आणि घामटं काढणारं काम म्हणजे document submission. मी महत्त्वाची काम आधी करायची असं ठरवून ठेवलं होतं. म्हणजे घरातला स्वयंपाक झाला की phd ची documents submission करायला all the way to Pune University! Submission आणि सहीच काम झालं की तिथल्या वाणिज्य शाखेतल्या वाचनालयात बसून मनसोक्त अभ्यास करायचा, तिथले प्रबंध वाचायचे आणि मग घरी यायचं. उरलेली सारी कामं.... भांडी, कपडे, आवरा-आवरी वगैरे मनोरंजक मालिका पाहत करून टाकायचे. अनेकदा सी. एच. बी. (क्लास आवर बेसेस) वर लेक्चर्सला बोलावणे जायचे विविध महाविद्यालयांतून. मग नोकरी सारखं तिकडेही काही तास जायचे. शिकवणं माझी आवड असल्याने ते आरामात जमायचं. पण जाणं-येणं त्रासदायक ठरायचं. मग आमचे यजमान यात मदत करायचे जमेल तशी. घरचं काम जास्त राहिलं तर सासूबाई मदत करायच्या. मुलीलाही मदतीला घ्यायचे. स्वयंपुर्ण बनून जगायची तिला सवय लागावी, हा छुपा हेतूही होताच त्यात, पण आपल्याला

आपल्या कामात मदत केली की तिला आपल्या कामाचे महत्त्व पटेल आणि विश्वास वाढेल, हे ही महत्त्वाचे! घरी यायला संध्याकाळ होणार असेल, तर मुलीला भाजी चिरून ठेव, बटाटा सोलून ठेवं, कूकर लावं.... अशी छोटी छोटी कामं सांगायचे, जी सोप्पी असतात पण करायला मात्र वेळ लागतो. त्यामुळे मला वेळेवर स्वयंपाक करणं शक्य व्हायचं.

ज्या दिवशी Phd ची महत्त्वाची कामे असतील, त्या दिवशी पाहुणे-रावळे, नातेवाईक वगैरे कटाक्षाने टाळायचे आणि घरात असा स्वयंपाक बनवायचा, ज्यात आपला कमीत कमी सहभाग असेल.

म्हणजे घरात टिकाऊ पदार्थ करून ठेवण्यावर भर असायचा. भाजी ऐवजी लोणचे, चटण्या खायला ठेवायच्या. म्हणजे भाजी बनवण्याचं काम नाही.... अश्या एक ना अनेक छोट्या छोट्या युक्त्या लढवून इकडचा वेळ वाचला आणि अभ्यासात लावला.

CHB वर सिनियर कॉलेजला बोलावले जायचे तेव्हा १२-१२:३० पर्यंत तासिका संपायच्या. मग एकूणच दिवसाचा आढावा घेऊन स्वयंपाकाची तयारी करायचे. सकाळी जवळ जवळ ५ ला उठून स्वयंपाक बनवलाय मी कैकदा.

तसं वेळेशी ताळमेळ जमला तर आवडं आणि सवड दोन्ही हाताळायला जमतं. मी वेळेचं मूल्य जाणलं आणि जपलं इतकंच!

**बाहेरची कामं करून (नोकरी करून) घरची कामेही करणं हे आजकाल स्त्रियांवर लादण्यात आलेलं अवाढव्य अपेक्षांच ओझं बनू लागलं आहे. म्हणजे पैसाही कमवा आणि घरही सावरा. हे आव्हान पेलताना स्त्रियांची चिडचिड होते, शारीरिक थकवा येतो, आणि एकूणच दगदग होते. तुम्हाला काय वाटतं?**

तडजोड करणं ही काळाची गरज असते. पण स्त्रिया आणि पुरुष यांच्यात समाजाने ढोबळमानाने केलेल्या कामाच्या आणि जबाबदाऱ्यांच्या वाटणीशी मी सहमत नाहीये. तसं बघायला गेलं तर एकट्या असणाऱ्या स्त्रिया स्वयंपुर्ण असतात. कमावून आणणं आणि बनवून खाणं दोन्ही त्यांना जमत आणि

हा त्यांच्या बाजूने प्लस पॉईंट आहे. पण एकटे राहणारे पुरुष मात्र खानावळीत किंवा हॉटेल मधून मागवून खाणं जास्त सोयीस्कर समजतात. ज्यामुळे त्यांची बचत कमी आणि आजारपण जास्त होतं.

जिथे प्रश्न एकत्र कुटुंबाचा येतो, तिथे साऱ्यांनी एकमेकांना सहकार्य करत प्रगती केली पाहिजे. म्हणजे आज तू स्वयंपाक नाही करू शकलीस तर मी करेन. किंवा यावेळी तुम्ही बील भरू शकणार नसालं तर मी भरेन, अशी भावना मनात असली पाहिजे आणि त्याचं आचरणही झालं पाहिजे.

अपेक्षांच्या ओझाचे म्हणालं, तर ते तर पुर्वापार चालत आले आहे. पण स्त्रियांवर लादलेल्या अपेक्षांच ओझं त्यांनी किती वेळ खांद्यांवर उचलायचं, हा ते ओझं उचलणाऱ्या स्त्रियांचा स्वतःचा निर्णय आहे.

तशी चिडचिड प्रत्येकाची होते. अगदी पुरुषांचीही. स्त्रियांना काम दुपटीने पडल्याने आणि शरीराचा स्थायी स्वभाव नाजूक असल्याने जास्त होतं असावी. पण मी लहानपणा पासून आईच्या आध्यात्मिक विचारांची कास धरल्याने योगा बैठक, संतवचने यांमुळे माझी चिडचिड इतकी होतं नाही.

मला वाटतं माझी योग प्रवेश परिक्षा या मानसिक स्थैर्याचे कारण असावी.

**पुरुष घर चालवण्या करता राबतो आणि स्त्री स्वतःची हौस किंवा मौज पुरवण्याकरता, असा गैरसमज सर्वत्र दिसून येतो. स्त्री-पुरुषाला असमान पगार असणं या सर्रासपणे दिसणाऱ्या भेदभावाला शिक्षकी पेशा अपवाद आहे असे वाटते का?**

नाही. पगारात असमानता आहे, हे खरं आहे. पण निर्भीडपणे स्त्रिया या बद्दल आवाज उठवतील, आणि नोकरी देणारे सुद्धा या गोष्टीचा विचार करतील, या बद्दल मी आशावादी आहे.

**PHD आवड म्हणून केलीत की सर्वोच्च शैक्षणिक पात्रता गाठावी अशी महत्वाकांक्षा म्हणून?**

खरंतर, आता शिक्षकाने PHD असणे सक्तीचे बनले आहे. पण मला आवड आहे त्यामुळे मला तो नियम जाचक वाटतं नाही. PHD फक्त एक प्रमाणपत्र नाहीये माझ्यासाठी. तो प्रवास आहे जो तुम्हाला प्रगल्भ बनवतो.

**पुणे विद्यापीठाचे वाणिज्य विभागाचे वाचनालयातल्या निवांतपणाने मला मन एकाग्र करून अध्ययन करायला खूप मदत केली आहे. आणि मी जितकी जास्त वाचत गेले तितकं जास्त ते आवडायला लागलं. त्यामुळे PHD आवडंही होती आणि गरजही!**

**या वयात हे असे अवघड ध्येय सर केल्यावर आनंद झाला असेल, श्रमाचं फळ मिळाल्याचं समाधान वाटलं असेल. पण बाधाही आलेल्या असतीलच. त्याबद्दल आम्हाला काही सांगा.**

खूप बाधा होत्या. घरातल्या कोणाची तब्येत बिघडायची, कोणाचं काहीतरी बिनसलेलं असायचं, कोणी कधी हॉस्पिटलमध्ये असायचं. यजमानांची दोन-तीन मोठ्ठाली ऑपरेशन्स झाली. पण या सगळ्यातून स्वतःला सावरताना आध्यात्म, PHD त मन गुंतवणं अश्या गोष्टी करत राहिले.

माझी आई म्हणायची, कोणी पाट फेकून मारला तर तो जमिनीवर मांडून त्यावर बसावं आणि तो फेकणाऱ्या व्यक्तीचे आभार मानावेत. काहीही झाले तरी सकारात्मक बाजू शोधण्याचे संस्कार असले, की ठेविले अनंते तैसेची राहावे, हे वाक्य ही सकारात्मक दिसू लागते.

# *रखमा...*

*सिध्दि चव्हाण - siddhic.blogspot.com*

**' साथीच्या रोगान विठोबाचे निधन झाले, आणि सगळ्या जबाबदार्या, सगळ्या कर्तव्यांच ओझ रखमावर पडलं. ४-५ वर्षाचा म्हादु आणि ६-७ वर्षाची गंगी ही दोन मुले... त्यांच्या शाळेची, पोटा-पाण्याची ही सगळी जबाबदारी पार पाडताना तिची पुरती दमछाक होऊन जायची. त्यात हातात जमीनीचा फक्त एक तुकडा 'मारुतीचा माळ', तो पण रेताड भाग, अगदी डोंगरा लगतचा ...पीक आलच तर अगदी जेमतेम... अन त्यावरही मानसातल्या कोल्हया, लांडग्यानची नजर होती. तिच्या तोंडचा घास बळकावण्यासाठी हे लोक आपापल्या परिने प्रयत्न करत असत. या सगळ्यांना पुरून उरणारी रखमा आता मात्र मनोमन खचत चालली होती. नवरा अकाली गेल्याचे दुःख होतेच, तरीही आपल्या दोन लेकरांकडे बघून त्या मारुतीरायाला साकड घालत, ती एक-एक दिवस ढकलत होती. '**

**आषाढ मध्यावर आला, पेरणीची हिरवीगार पीकही मळीमध्ये दिमाखात डोलू लागली, आणि लावनीची लगबग सुरु झाली होती.**

**"आज उजाडल्या पासनं वातावरण पावसाच हाय! ढग फुटल्यागत कोसळतोय ... आकाडाचा पाऊस लावनीला उमद्या जोमान फुलवतो." रखमा नुकतेच नेसुन आलेले लाल-निळे पातळ चापुन-चोपुन निटनेटके करत, घराच्या दारातून हलकेच डोकावत बडबडत होती.**

**"माय यकटीच काहुन बडबडते गं?" गंगी तिच्याकडे गमतीने पाहुन विचारु लागली.**

**"आज पाऊस मोप हाय. दोग पन शाळला जाऊ नगा. म्या मारुतीच्या मालावर जाते, आन भात लावुन घेते. आज लावनी केलीच पायजे."**
**हातात मातीचा दिवा आणि अगरबत्ती घेऊन ती चुलीकडे वळली. पेटत्या जाळावर अगरबत्ती टेकवून दिवा लावत-लावत पुन्हा देवाकडे वळली.... पुढ्यातल्या बाप्पाच्या फोटोंपुढे ओवाळणी करत तिने हात जोडले.**

**"माय मी बी येव काय? "    छोटा म्हादु तिच्या पदराला धरुन खेचत मागे लागला.**

**"सोन्या एकच विला हाय ना... मग तु काय करणार र येऊन... पाऊस बी मोप पडतोय. भिजलास त शीक पडशील, गंगी शालेत बी जाऊ नग हा... आज घरातच थांबा."**
**हातातला विळा दाखवर रखमाने त्याची भाबडी समजुत काढली. आणि ते समजुदार लेकरु ते सुद्धा गप्प बसले.**
**फाटक-तुटक ईरल तेवढच पावसापासून आधाराला होते... ते हातात घेऊन, भाकरीची टोपली सोबत घेऊन तिने दार लोटले.  डोक्यावरचा पदर सावरतं, ऊजाड कपाळाने ती पहिल्यांदाच घराबाहेर पडत होती.  ओल्या झालेल्या डोळयांच्या कडा लपवण्यासाठी तिने पाठमोरीच हात करुन मुलांचा निरोप घेतला.**

**सदा भाऊ शेत नांगरणी करत होता. भारी रबरबीत कमरेएवढ्या चिखलात शेतीची लावनी रंगली होती.  आणि  भरला पाऊस बघुन किसनी माळीन झोकात गाणं गात होती. तिच्या गाण्याबरोबर काम करण्यासाठी हुरूप आला होता.**

***" हिरव सोनं पिकल या***
***शेतात नागर रुतल या***
***चल राजा ररर , चल सर्जा***
***लावनीच गान सुचल या***
***आता लावनीच गान सुचल या !"***

**रखमाकडे पाहुन सगळ्यांचेच डोळे मोठे झाले.  हि एकटी शेत लावणार आणि नांगरणी कोण करायचे? ' हा प्रश्न सदा भाऊच्या अगदी तोंडावर आला होता. पण तिची विचारपुस करण्यास मात्र कोणी ही धजेना. शेवटी पुढे जाता-जाता न राहवून रखमानेच तोंड उघडले.**
**"भाऊ झाली काय नांगरणी... चांगलाच जोर लावलाय म्हणायचा! "**

**एवढ्यात किसनी माळीन तोंड वर करुन बोलली.**

"रखुताई! सरासरा नांगरणी करुन, कमरेपातूर रबरबीत चिखल तयार पायजे, तवा कुठ सोनं पिकतया! ह्या बाई मानसाच काम न्हाय व. तू यकली कस करायची समद? "

"वयनी जमत का ते तर बगु. बाकी समदी माझ्या मारुतीरायाची किरपा हाय म्हणा, तो आडत्याला वर काडतुया बगा. " रखमा शेताकडे वळली. कमरेचा विळा बांधावर ठेवुन तिने मारुतीरायाला हात जोडले.

"देवा तु गोरगरीबांच्या हाकला धावतुया, काटाकुट्यांपासुन समद्याच रक्षण करतुया, गुराढोरावर तुझी आशीच किरपा ठेव. आज पासुन लावनीला सुरुवात करते , कष्ट कराया मी डगमगत नाय पण माझ्या धन्यासार माझ्या बी अंगात बळ दे !"
मंदिराकडे दृष्टी करुन केळीच्या पानावर ठेवलेला दही-भाताचा नैवेद्य दाखवत तिने डोळे मिटले. तोच तिचा थोरला भाऊ सोबत बैलजोडी आणि नांगर घेऊन आपल्या बहिणीच्या मदतीसाठी पोहोचला होता.
"रखुताय सुरवात करायची का मंग? "
हाकेसरशी रखमा मागे वळली..." थोरल्या कधी आला र? म्हंजी कालचा निरोप मिळला व्हय! आक्षी देवासारा धावलास म्हणायचा. "

"निरोप मिळाला आन बेगिन धावत आलो बग. पावसाचा जोर बी वाडलाय. बाविच्या वाडीत पानी भरलय, आन मानखोऱ्यात तर लोक घरातून भाईर पडनात, आग समद्या नद्या-नाल भरुन व्हावत्यात."
"काय बोलतु थोरल्या यवढा पाऊस भरला म्हनायचा? "
"व्हय ग. मी नांगरतु, तोवर तु ढेकळ सारकी कर. कामाला लागु... जादा वेळ दवडुन जमायच न्हाय." म्हणत थोरला कामाला लागला होता.

‘सकाळच्या पहिल्या प्रहराला आलेली रखमा आणि थोरला, दुपार भरेपर्यंत शेतात राबत होती. पावसाने जोर अजुनच वाढवला. बरेच पाणी-पाणी झाले होते. त्यातच दोन वेळा बाळा पाटील घिरट्या घालून गेला.... त्याला पाहताच क्षणी रखमाच्या काळजाच पाणी झालं. गावातल्या बाया-पोरींवर

याची वाईट नजर होती. आज कित्तेक दिवस या छोट्याश्या जमिनीच्या तुकड्यासाठी देखिल तो रखमाच्या मागे हात धुवून लागला होता. पण रखमा त्याला दाद देत नव्हती.'

"का ते म्हाइत न्हाय, पन थोरल्या, आजचा दिवस लय वंगाळवाना वाटतोय... नुसत कसनुस झालय र्! "

ताठ उभी राहुन चौफेर नजर टाकत ती उगाचच बडबडली. पण थोरल्याच तिच्याकडे लक्ष नव्हते. शेतबांधावरच्या आईनाच्या झाडावर चढून त्याने टेहळणी करायला सुरुवात केली होती. शेवटी आ वासुन तो झाडवरुन सरसर उतरला...आणि डोक धरुन मटकन खाली बसला.

"रखु आग आभाळ फाटल बगं! मागची नदी भरली ग, नदीवरना पानी व्हावतय. वरला पुल बी दिसनासा झालाय. आर्र माज्या देवा! काय केलस काय र् हे? "

थोरल्याची अशी दिनवाणी अवस्था पाहुन रखमाला परिस्थितीचा अंदाज आला. थोरल्याला आता लवकरच निघायला पाहिजे. नाहीतर त्याच्या गावाला जाणारे सारेच रस्ते बंद होतील, हे ओळखून तिने थोरल्याला उठवले.

"उठ हिम्मत हारु नगस. ही नदी भरली पन आपल्या धरनाची नदी मोठी हाय, ती भरायच्या आत गाव गाठ... हितन डावीकडन जा... फोफळीच्या दोन बागा उलाटल्या की आट- धा पावलावर धरणाचा पूल लागतु बग."

"आग पन हित तू यकटी कशी लावनी करायचीस, अजुन तास- दोन तासाच काम हाय न्हव? " थोरला शेतावर एकवार नजर टाकत म्हणाला.

"बेगीन पल आता... डोक्यावर पाऊस बग किती भरलाय. पानी अजुन भरल त मग आडकुन बसशील.... तुझी पोर वाट बगत आसतील न्हव. हे समद म्या बगती... तू आजाबात कालजी करु नगुस. नीग आता."

रखमाचा थोरला भाऊ तिचा निरोप घेऊन निघाला, आपले बैल-नांगर असे साहीत्य गुंडाळत, डावीकडून धरणाच्या पुलाच्या रस्त्याने झपझप पावले टाकत निघून गेला होता. पोटाची खळगी

भरण्यासाठी गेले तास दिड-तास रखमा एकटीच लावणी करत होती. अर्धे-निम्मे शेत देखील अजून लावून झाले नव्हते. एवढ्यात आजुबाजुच्या शेतातील मजुर-माणसाची पळापळ सुरु झाली.
"पूर आला... पूर. घरला पला र गड्यांनो! मानस व्हावत्यात... गाय-बकरी बी व्हावुन गेली. पला र्र पला. घराकड पला! "

हातातील आवे खाली टाकुन गडी-मानसे आणि बाया-बापड्या दिसेल त्या मार्गाने घराकडे पळत सुटले होते. गावामध्ये पाणी भरलं असणार हे एव्हाना रखमाच्या लक्षात यायला पाहीजे होत. पण हे शेत अगदी डोंगरालगल असल्याने इथे जास्त पाणी साचुन राहू शकत न्हवते. ' डोंगरा लगलच्या शेतीसाठी मुसलधार आकाड्याचा पाऊस पायजे नायतर यक आवा बी रुतायचा नाय ह्या जमीनीत...' ही तिच्या नवऱ्याने सांगीतलेली गोष्ट लक्षात ठेवुन ती पावसाच्या जोरावरती शेत लावतच राहीली. गावाकडची खबर तिला लागली नाही. आता फार उशीर झाला होता.
"मारुतीराया माझी चिमुकली दोन लेकर घरात एकलीच हायत र! त्याची राकन कर देवा!"
मनोमन मारुतीचा धावा करत रखमाने घराकडे पळ काढला. जिवाच्या आकांताने ती पळत सुटली.

१०-१२ मिनिटाचा रस्ता संपतो न संपतो तोच घात झाला होता. रस्त्याच्या बाजुला डोलणार्या पिंपळाच्या झाडामागे आडुन बसलेला बाळा पाटील अवचीत येवुन रखमाच्या पुढ्यात टपकला होता. त्याने अशी वाट अडवलेली पाहुन रखमा घाबरली... तिने आजूबाजूला नजर फिरवली तर कोणी चिटपाखरूही दिसेना. सगळे लोक शेतातून केव्हाचेच पांगले होते.
"काय रखुबाई! फार वाट बगाय लावता ओ ... घरातून भायर बी पडत न्हाय. शेवटी मीच शेतात आलो. " पाटील तिच्या थेट समोर उभा रहात म्हणाला.

"पाटील, काय काम हाय? लवकर बोला, माझी पोर वाट बघत्यात... घराकड यकटीच हायत." पाटलाची आपल्यावर असलेली वेडीवाकडी नजर पाहुन रखमाच्या अंगाची आग झाली होती. तरीही तिने शांतपणे विचारले.

"यका शेताच्या तुकड्यावर यवढी ऊडते व्हय, त्याच्या दुप्पट पैसा देतो बग. गप-गुमान ही जमीन मला मला दे." पाटीलाने डायरेक्ट विषयला हात घातला होता.

"पाटील माझ्या हाक्काचा तेवढाच तुकडा हाय. तो देवुन कस जमल? पोरं मोठी झाली की तेवढीच एक शिदोरी हाय तैनला. " रखमा ताट मानेने उत्तरली.

"ईचार कर रखमा... तुझी पोरं यकटीच घरात असतात, आणि तू बी हित यकटीच हायस.... कायबी होवू शकत हा." म्हणत पाटील खीssखीss करून बेशरमीपणाने हसला, आणि तिच्या अजुनच जवळ येण्याचा प्रयत्न करु लागला.

त्याचे ते हिडीस शब्द ऐकुन रखमाच्या हाता-पायाची आग आग झाली.
"पाटला गप-गुमान वाट सोड, माझी पोरं वाट बघत्यात. उगा वाकड्यात शिरू नग. "

आपला ' पाटला ' असा एकेरी उल्लेख केलेला पाहुन पाटील सापासारखा फणकारला...
"मला उलट बोलते व्हय. दावतोच तुला." म्हणत त्याने झटक्यात एका हाताने तिच्या केसाचा बुचडा पकडला. बेसावधपणे ओले झालेले केस जोरात ओढल्याने रखमाच्या डोक्यातुन एक सणसणीत कळ उसळली. बिचारी कळवळली ...तिने हात-पाय मारुन पाहीले, पण काही केल्या तिला त्याचा हात सोडवता येईना. अगदी हताश होऊन तिच्या डोळ्यात पाणी तरळले. ती आता काही करु शकत नाही, हे पाहुन बाळा पाटलाला अजुनच चेव एढला. त्याने चक्क तिच्या पदराला हात लावला होता. केसावरची त्याची पकड सैल झाली, हे पाहुन संधीचा फायदा घेत रखमाने कमरेला लावलेला विळा सरकन वरती ऊपसून काढुन उजव्या हातात पकडला होता. क्षणाचाच अवकाश... एक गगनभेदी किंकाळी आणि पिचकारी सारखी उडणारी रक्ताची धार एकाच वेळी बाहेर पडली.

"पाटला! खर बोललास .... काय बी होवु शकत."
रखमा मोठ्याने ओरडली. आणि त्या सरशी तिने त्याला रक्तबंबाळ अवस्थेत किसनी माळीनीच्या बाजुलाच असणार्या शेतात ढकलुन दिले. तिच्या नवऱ्याच्या एकुलत्या एक शस्त्राने पाटलाच्या हाताचा अचुक नेम घेतला होता. हाताच्या तुटलेल्या नसीने पाटलाला उभ्या-उभ्या चिखलात आडवे केले. सदा भाऊने सकाळीच शेत लावणीसाठी तयार करून ठेवलेल्या कमरेपर्यंतच्या रबरबीत चिखलात पाटील सपशेल आडवा पडला. बाळा पाटील कायमचाच चिखलात रुतला, पुन्हा केव्हा ही

**वरती रुजुन न येण्यासाठी. उभ्या शेतातील लाल चिखलावर एक वेगळीच लाल करा अलिप्तपणे पसरली होती. अशा पापी मानसाचे रक्त सामावून घ्यायला ती जमीन ही आज तयार नव्हती. पाठमोरी रखमा उजव्या हातात तोच रक्ताळलेला विळा घेऊन, तशीच भिजलेल्या अवस्थेत बेभान होऊन पुन्हा घराकडे धावत सुटली.**



**काही ग्रामीण शब्द -**

आकाडा -आषाढ.

मोप - खुप.

ईरल - बांबूचे वेत, पालापाचोळा तसेच थोड्या प्रमानात प्लॅस्टीक वापरुन तयार केलेले, पावसापासुन सौरक्षण करण्यासाठी शेतात वापरले जाणारे साधन.

यकली - एकटी.

वंगाळवाना - विचित्र असा.

आभाळ फाटणे - मुसळधार पाऊस येणे.

व्हावत्यात - वाहुन जातात.

आवे- लावनीस तयार झालेल्या हिरव्या भात शेताच्या छोट्या-छोट्या काड्या.

हिडीस - घाणेरडे / वाईट.

केसाचा बुचडा - केसाचा अंबाडा.

सपशेल – संपूर्ण / पूर्णपणे.

# घुसमट जीवाची

प्राची प्रकाश देशपांडे

"ती"मुलगी म्हणून जन्माला येते
आईबापाची लाडकी लेक असते
कधी कधी कुठे नकोशी होते
जन्माला येण्याआधीच कळी खुडली जाते -१-

ती जन्माला येताच
कुणाची बहिण असते
कुणाची नात कूणाची भाची असते
सारी नाती निभावत रहाते -२-

तारुण्यात पदार्पण करताच
ती अंगोपांगी मोहरते
नटते सजते लाजते
आरशात वारंवार पहाते -३-

ती बोहोल्यावर उभी रहाते
ती कूणाची अर्धांगिनी होते
सप्तपदी चालून पतीशी एकरुप होते
सुखदुःखात त्याच्या साथ देते ४-

ती आता गृहिणी होते
सणवार कुळाचार रमून जाते
आला गेला पै पाव्हणे
सासूसासरे सर्वांचे करत रहाते -५-

ती आई होते नि भरुन पावते
आई होताना वेणा सोसते
बाळाला पहाताच आनंदून जाते
जन्मभर निरपेक्ष माया करत रहाते-६-



*(सशक्त नारी घडवेल सशक्त समाज.)*

# अपवादात्मक अपवाद

चेतन सुभाष गुगळे

भारतीय समाजाने येथील मानवांची अलिखित आणि अनौपचारिक वर्गवारी केलेली आहे. या वर्गवारीनुसार पुरुषांनी कसं वागावं, महिलांनी कसं वागावं, याचे काही एक नियम ठरून गेले आहेत. महिला आणि पुरुषांमध्ये असणाऱ्या शारीरिक भेदांशिवाय त्यांच्या बौद्धिक आणि मानसिक क्षमतेतील फरकदेखील समाजाने ठरवून टाकला आहे. या आखणीनुसार महिला व पुरुषांची कार्यक्षेत्रेही ठरली आहेत. त्यानुसार ढोबळ मानाने घराच्या आतले कार्यक्षेत्र हे महिलांचे आणि घराबाहेरचे कार्यक्षेत्र ही विभागणी तर फारच जुनी आहे. परंतु या नियमांना अपवाद म्हणून काही महिला या घराबाहेर देखील कार्यरत राहतील हे समाजाने मान्य केले आहे. या अपवादांची देखील समाजाने पुन्हा वर्गवारी केली आहे. त्यानुसार आर्थिकदृष्ट्या निम्नवर्गीय महिला या घरकाम अथवा लघु उद्योगातील कामगार म्हणून कार्यरत राहतील असे ठरले आहे. प्लंबर, सुतार, लोहार (वेल्डर / फॅब्रिकेटर), रेल्वे स्थानकावरील हमाल, वाहन / मोबाईल / इलेक्ट्रॉनिक वस्तू दुरुस्ती कारागीर या खास पुरुष राखीव जागांवर चुकूनही महिला दिसणार नाहीत. मुद्रण उद्योगात (छापखान्यात) महिला आहेत पण त्या कुठे? तर यंत्रावर पुरुषांनी मुद्रणाचे मुख्य काम केल्यावर मुद्रित कागदाच्या घड्या घालणे, पुस्तके चिटकविणे अशा कमी जोखमीच्या आणि अर्थातच कमी मोबदल्याच्या कामावर. वर्तमानपत्र विक्रीतही घरोघरी दुचाकीवरून वर्तमानपत्रे पोचविण्याचे काम पुरुषांचे तर महिलांचे काम दुकानात एका जागी बसून विक्री करण्यापुरतेच मर्यादित. रिक्षा, टेम्पो, ट्रक अशा व्यावसायिक वाहनांचे चालक देखील पुरुषच. टॅक्सीचालक म्हणून आता काही प्रमाणात महिला पुढे येताहेत पण त्या देखील प्रियदर्शिनी सारख्या संस्थेच्या माध्यमातून, स्वतंत्र पणे नव्हे. शिवाय त्यांचे प्रमाण देखील अत्यल्पच आहे. खासगी वाहनांचे चालक या पदावरही अजूनही पुरुषांचेच साम्राज्य आहे. आर्थिकदृष्ट्या मध्यमवर्गीय महिलांचे प्राधान्य अध्यापन, कला, सेवा क्षेत्रात राहील हे गृहीत धरले जाते. उद्योग, अभियांत्रिकी, वैद्यकीय अर्थ, गुंतवणूक या क्षेत्रात जर महिला असल्याच तर त्यांच्यावर प्रामुख्याने कमी जबाबदारीचे अथवा दुय्यम श्रेणीचे काम राहील हे पाहिले गेले आहे. उदाहरणच घ्यायचे तर कार्यालयात पुरुष व्यवस्थापक तर महिला स्वागतिका, विमान सेवेत पुरुष

वैमानिक तर महिला हवाई स्वागतिका, इस्पितळात पुरुष शल्य विशारद तर महिला परिचारिका अशा प्रकारे भूमिकांचे वाटप झाले आहे.

उच्च आर्थिक गटातील महिलांची परिस्थिती काय आहे? विविध उद्योगसंस्थांच्या मालक, संचालक या पदांवर महिला दिसतील. राजकारणातही काही मोजक्या उच्च पदांवर महिला आहेत. पण त्या तिथे का आहेत? तर त्या एखाद्या घराण्याशी संबंधित आहेत म्हणून. जसे की, कायनेटिक उद्योगसमूहाचे मालक श्री. अरुण फिरोदिया यांच्या कन्या सुलज्जा फिरोदिया-मोटवाणी. पंडित नेहरूंच्या कन्या इंदिरा गांधी इत्यादी. जर सुलज्जा व इंदिरा यांना सख्खे समवयस्क बंधू असते तर त्या आपल्या पित्याच्या वारसदार ठरल्या असत्या काय? २०१४ लोकसभा निवडणूकीत मुंबईमध्ये एक अपवादात्मक चित्र दिसले. सुनील दत्त व प्रमोद महाजन या दिवंगत राजकारण्यांच्या कन्या प्रिया व पूनम एकमेकींच्या विरोधात खासदारकीची निवडणूक लढवीत होत्या. या घटनेत या दोघींनाही सख्खे भाऊ असतानादेखील आपापल्या पित्याचा वारसा या दोन्ही कन्यांकडे आला. अर्थात या दोघींचे बंधू संजय दत्त व राहुल महाजन वैयक्तिक कारणांमुळे ही निवडणूक लढविण्यास असमर्थ असल्यानेच या दोघींना ही संधी मिळाली.

अर्थात या सर्व व्यवस्थेला आव्हान देत अनेक मध्यम व उच्च मध्यम आर्थिक गटातील महिलांनी अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने मोठमोठी पदे मिळविली आहेत. तसेच उच्च आर्थिक गटात (कॉर्पोरेट विश्व) इंद्रा नूयी, चंदा कोचर अशा महिलांनी आपले स्थान पुरुषांच्या बरोबरीच्या पातळीवर आणले आहे. इतके असले तरीही अजून लिमिटेड कंपन्यांपैकी ५५ टक्के कंपन्यांमध्ये (किमान एकतरी महिला संचालक नेमणे कायद्याने बंधनकारक असूनही) एकही महिला संचालक नाही ही बाब दुर्लक्षित करून चालणार नाही. शिवाय मोठ्या पदांवर असणाऱ्या व संख्येने अत्यल्प अशा महिला या त्या ठिकाणी अपवादानेच आहेत हे देखील विविध नियतकालिकांतून लेखांद्वारे सातत्याने लोकांसमोर मांडण्यात येते जेणेकरून महिलांचे अशा स्थानी असणे सहजसाध्य नाही तर अतिशय जिकिरीचे आहे हे इतर महिलामनांवर बिंबविले जावे.



कला विश्वातले महिलांचे स्थान काय आहे? चित्रपट, नाट्य ही क्षेत्रे समाजाचा आरसा आहेत. त्यामुळे अर्थातच त्यांच्या कथांमध्ये महिला व पुरुष पात्रांचे प्रमाण सारखेच असणार. त्यामुळे अभिनय व गायन क्षेत्रात महिला व पुरुष यांचे प्रमाण सारखेच असणे नैसर्गिक आहे. (अर्थात पूर्वीच्या काळी महिलांच्या भूमिका देखील पुरुषच करीत, त्यामुळे तिथेही महिलांचे प्रमाण कमीच होते पण आता ती परिस्थिती राहिली नाही.) गायक व गायिकांचे आणि अभिनेते व अभिनेत्रींचे संख्यात्मक प्रमाण सारखे असले तरीही त्यांच्या दर्जात्मक प्रमाणातला फरक लक्षणीय आहे. अभिनेत्यांची कारकीर्द तुलनेने प्रदीर्घ व आव्हानात्मक आहे तर अभिनेत्रींची कारकीर्द अल्प स्वल्प तसेच अभिनयाला फारसा वाव नसणारी आहे. त्यांच्या मानधनातला फरकही लक्षणीय आहे. गायक व गायिकांमध्ये असा फरक दिसून येत नाही. किंबहुना तिथे प्रकार उलटाच आहे. १९८० साली वयाच्या अवघ्या पंचावन्नाव्या वर्षी मोहम्मद रफी आणि १९८७ साली वयाच्या अवघ्या अठ्ठावन्नाव्या वर्षी किशोर कुमारांचा मृत्यू झाला ही बाब लक्षात घेता आणि आघाडीच्या गायिका लता व आशा या तुलनेने दीर्घायुषी ठरल्या आहेत हे पाहता गायक व गायिकांची कारकीर्दीची तुलना करणे थोडे किचकट असले तरीही हे लक्षात घ्यावे लागेलच की आशा व लता या दोघींनी कुठल्याही पुरुष गायकापेक्षा अफाट संख्येने गाणी गायली आहेत. या दोघींच्या जास्त गाण्यांमुळेही पुन्हा महिला पुरुष असमानताच सिद्ध होते आणि तीदेखील गायनक्षेत्रातली नव्हे तर अभिनय क्षेत्रातली. लता व आशा यांना पुरुष गायकांपेक्षा जास्त गाणी मिळण्याचे कारण -

चित्रपटात नायिकेलाच नाचगाण्याला जास्त वाव असतो. नायक तुलनेने महत्त्वाचे असे म्हणजे शौर्य, धाडस, पराक्रम, बौद्धिक कसोटी यात व्यग्र असतो.

नायिका कुणीही असली तरीही तिला कुठलाही कॉमन आवाज चालतो. फार तर सोज्वळ गाण्यांकरिता लता आणि कॅब्रे, इत्यादी बोल्ड गाण्यांकरिता आशा अशी विभागणी पुरेशी आहे हा चित्रपटकर्त्यांचा दृष्टिकोन. याउलट नायक कोण आहे? त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा बाज काय आहे? हे नीट विचारात

घेऊन त्यानुसार त्याकरिता गायकाचे नियोजन. जसे की देव आनंद व राजेश खन्ना करिता किशोर कुमार, दिलीपकुमार व शम्मी कपूर करिता मोहम्मद रफी, राज कपूर व मनोज कुमार करिता मुकेश ही विभागणी पुरुष गायकांना कमी काम मिळवून देणारी असली तरीही पुरुष अभिनेत्यांचे महत्त्व वाढविणारीच ठरते नाही काय?

याशिवाय कला प्रांतातील महिलांच्या बाबतीत असणारे विविध प्रवाद. त्या स्वतःच्या क्षमतेवर किती आणि पुरुषांचा शिडी सारखा वापर करून किती वरपर्यंत चढल्यात याबाबत चर्चिले जाणारे किस्से. या व्यवस्थेलाही तोंड देत एखादी महिला अगदी उघडपणे व निःसंशय स्वतःच्या मेहनतीच्याच जोरावर यशशिखरावर विराजमान झाली असेल आणि उणीव दाखववी असे तिच्यात शोधूनही सापडण्यासारखे दूरान्वयानेही काही नसेल तर तिला लगेच वेगळ्याच कोंदणात बसविले जाते. मग ती सर्वांचीच ताई, माई, अक्का असल्याचा तिच्यावर शिक्का बसतो. ती कोणाची प्रेयसी, कोणाची मैत्रीण देखील होऊ शकत नाही. एका वेगळ्याच गंभीर नजरेने तिच्याकडे पाहिले जाते. याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे लता मंगेशकर. त्यांच्या पिढीतील, पुढच्या आणि त्याही पुढच्या पिढीतील सर्वच जण त्यांचा दीदी म्हणूनच उल्लेख करतात. त्यामुळेच जेव्हा त्यांच्या एका वाढदिवसाच्या जाहीर समारंभात सोनू निगमने "मी थोडा आधी जन्माला आलो असतो किंवा लताजी थोड्या उशीराने जन्माला आल्या असत्या तर मी त्यांना विवाहाकरिता मागणी घातली असती." असे विधान केले तेव्हा ते अनेकांना खटकले. सोनू निगमांवर टीकाही झाली. खरे पाहता सोनूने लताजींकडे पाहण्याच्या समाजाच्या चाकोरीबद्ध नजरेची कोंडी फोडली असेच म्हणावे लागेल. परंतु आपल्या समाजाने अपवादांचीही वर्गवारी केली असल्याने सोनूचे विधान समाजाच्या पचनी पडले नाहीच.

अपवादांची वर्गवारी करण्याची समाजाची सवय तशी फारच जुनी. महिला शक्यतो घरातच राहणार. घराबाहेर पडल्या तरीही त्यांच्यावर तसा प्रसंग आला तरच. म्हणजे झाशीची राणी ही शूर लढवय्यी असे आपण म्हणतो पण ती तशी का? तर तिचे पती गंगाधरपंत (जे तिच्याहून चाळीस एक वर्षांनी मोठे) यांच्या मृत्यूनंतर तिला अकाली वैधव्य आल्यावर राज्याचे रक्षण करण्याकरिता. कारण तिचा पुनर्विवाह होऊन तिच्या नव्या पतीला राज्याचा रक्षणकर्ता बनण्याची संधी देणंही परंपरेला मंजूर नाहीच. त्यापेक्षा अपवाद म्हणून तिलाच रणरागिणी बनविणं समाजाला जास्त सोयीस्कर आणि म्हणूनच राणीला श्रेयस्कर. पण या श्रेयाची धनीण होताना राणीला वयाच्या बाविशीतच मृत्यूला सामोरं जावं लागून फार मोठी किंमत चुकवावी लागली हे कोणी ध्यानात घेत नाही. [काव्यात्म न्याय

/ योगायोग म्हणजे उपग्रह वाहिनीवरील मालिकेत झाशीच्या राणीची भूमिका करून लोकप्रिय झालेल्या कृत्तिका सेनगर हिनेच पुढे पुनर्विवाह या मालिकेत महिलेच्या पुनर्विवाहाचा मुद्दाही ऐरणीवर आणण्यात मुख्य भूमिका निभावली.] असो. तर झाशीच्या राणीचे शौर्य हे अपवादच होते असे समजणाऱ्या समाजाच्या मानसिकतेचे पुरावे म्हणजे झाशीच्या राणीच्या इतिहासोत्तर काळात जन्माला आलेल्या मुलींनाही घोडसवारीचे प्रशिक्षण दिले जात नसे. अगदी त्यापुढील काळातही किती जणी सायकली अथवा स्वयंचलित दुचाकी चालवीत असत? सुनीताबाई देशपांडे चारचाकी मोटार चालवीत आणि भाई चालकाच्या बाजूला बसत. एकदा सुनीताबाई रस्त्याने अशाच गाडी चालवीत असताना दोन मुले रस्त्यात दिसली. त्यातल्या एकाने दुसऱ्याला सांगितले - अरे बाई गाडी चालवतीये, बाजूला हो नाहीतर अपघातात सापडशील. त्यावर दुसरा पहिल्याला म्हणाला - काळजी करू नकोस शेजारी बाप्या बसलाय ना. तोच काळजी घेईल अपघात होणार नाही याची. आयुष्यात कधीही वाहनाचे सुकाणूचक्र न धरलेल्या भाईच्या केवळ शेजारी असल्यामुळे रस्त्यावरील मुलांना हायसे वाटावे आणि त्यापुढे सुनीताबाईंच्या वाहन चालविण्याच्या अफाट कौशल्याचा काडीचाही प्रभाव पडू नये याचे सुनीताबाईंना मोठे वैषम्य वाटले. पण सामाजिक वर्गवारीने पुरुष व महिलांची कार्यक्षेत्रे ठरविली त्याला सुनीताबाई किंवा रस्त्यावरची ती मुले तरी काय करणार?

पुरुषांप्रमाणे वाहन प्रमाणे वाहन चालविले, किंवा तसे कपडे घातले, किंवा तसे केस ठेवले तर ती महिला पुरुषी वृत्तीची ठरते काय? तिच्यातील स्त्री-सुलभ भावना लोप पावतात काय? अजिबात नाही. आणि हे समाजाला दाखवून दिले पुरुषांसारखे कपडे घालणाऱ्या, बारीक केस ठेवणाऱ्या आणि बरीचशी त्यागराज खाडिलकरांसारखी चेहरेपट्टी असणाऱ्या गायिका फाल्गुनी पाठकने. तिची सर्व गाणी पाहा आणि ऐका. प्रत्येक गाण्याचे बोल आणि सादरीकरण स्त्री-सुलभ भावनांचे यथार्थ प्रदर्शन मांडणारे आहे हे लगेच जाणवेल. आता तर अनेक महिला टिपीकल महिला वेषात आणि केशभूषेत राहून देखील खास पुरुषांची समजली जाणारी बुलेट सारखी वाहने देखील चालवीत आहेत. महिलांकडून आता अपवादांच्या वर्गवारीलाही आव्हान दिले जाण्यास सुरुवात झाली आहे.

मनोरंजन क्षेत्रात गायन, अभिनय अशा विभागांमध्ये महिलांची आवश्यकता असल्याने महिलांना स्थान आहे पण लेखन / दिग्दर्शन /संगीत दिग्दर्शन या विभागांत महिलांचा सहभाग अत्यल्प आहे. अपवाद म्हणून काही महिला या क्षेत्रात आहेत. त्यातही दिग्दर्शन हा प्रांत अतिशय विद्वत्तेचा समजला जातो त्यामुळे या प्रांतातील महिला अपवादाच्या वर्गवारीप्रमाणे अतिशय अभ्यासू, विद्वान आणि

महत्त्वाचे म्हणजे धीरगंभीर स्वभावाच्या हे ठरून गेल्यासारखे आहे. सई परांजपें ह्या अपवादाच्या परंपरेतला एक अपवादात्मक अपवाद. त्यांनी गंभीर चित्रपटांबरोबरच निखळ विनोदी चित्रपट देखील बनविले. परंतु मीरा नायर, कल्पना लाजमी, तनुजा चंद्रा या धीरगंभीर दिग्दर्शिकांनी पुन्हा अपवादाची वर्गवारीच सिद्ध केली.

अशा वेळी मनोरंजन विश्वाच्या क्षितिजावर उदय झाला फराह खानचा. ह्या दिग्दर्शिकेने पहिल्याच प्रयत्नात (मै हूं ना - २००४) प्रेक्षकांना अगदी खळखळून हसायला भाग पाडलं. विनोदासोबतच चित्रपटात देशभक्ती, प्रेम, शौर्य हे सर्व रस मिसळून एक चांगला मसालापट बनविला, त्याला उत्तम व्यावसायिक यश देखील मिळालं आणि समीक्षकांची प्रशंसाही. मुख्य म्हणजे शाहरुख सारख्या मनस्वी कलाकाराला लीलया हाताळलं. महिला अष्टपैलू नसतात किंवा अनेक आघाड्यांवर त्या एकाच वेळी कार्यरत राहू शकत नाहीत या पारंपरिक समजालाही तिने छेद दिला. मूळची ती तशी दिग्दर्शिका नव्हेच. पहिल्या दिग्दर्शकीय प्रयत्नापूर्वी तिने जलवा, सात साल बाद (१९८७), कुछ कुछ होता है (१९९८) आणि कल हो ना हो (२००३) या चित्रपटांमधून किरकोळ भूमिका केल्या होत्या. त्याशिवाय १९९२ च्या जो जीता वही सिकंदर पासून २००३ च्या चलते चलते पर्यंत तिने अनेक चित्रपटांत नृत्यदिग्दर्शिका म्हणूनही काम केले. २००४ साली दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण केल्यावरही तिने आपले हे जुने काम सोडले नाहीच. अजूनही ती पाहुणी अभिनेत्री आणि नृत्यदिग्दर्शिका म्हणून काम करतेच. शिवाय पटकथा लेखन आणि निर्मिती ह्या जबाबदाऱ्याही तिने पार पाडल्या आहेत. इतकेच नव्हे तर शिरीन फरहाद की तो निकल पडी या चित्रपटाद्वारे तिने पूर्ण लांबीची नायिकेची भूमिकाही निभावली आहे. तेही वयाच्या सत्तेचाळिसाव्या वर्षी आणि पारंपरिक नायिकेला शोभेल अशी शरीरयष्टी नसतानाही.

त्याशिवाय आपल्या दिग्दर्शकीय आणि नृत्यदिग्दर्शकीय कौशल्यातून इतर कोणालाही न जमलेली गोष्ट सर्वात आधी साध्य करून दाखविली. कत्रिना कैफने पदार्पणातच (बूम - २००३) बिकिनी दृश्य दिले. इतर अनेक चित्रपटांतूनही तिने देहप्रदर्शनाचा अजिबात संकोच केला नाही. परंतु इतके करूनही ती कधी 'मादक' किंवा 'चालू' दिसू शकली नाही. याचे कारण तिच्या चेहऱ्यावर असलेले कायमचे निरागस भाव. अगदी अक्षय कुमार सोबतच्या नमस्ते लंडनमध्ये तिच्या संवादांमुळे ती भांडकुदळ किंवा उर्मट वाटली असली तरीही तिला 'चालू' दाखविणे कुठल्याच दिग्दर्शकाला जमले नव्हते. परंतु ही बाब जणू एक आव्हानच आहे असे समजून फराह खानने तिला तीस मार खान चित्रपटात शीला की


जवानी या गाण्यातून 'मादक' किंवा 'चालू' रूपात प्रेक्षकांसमोर सादर केले. या गीतात कत्रिनाच्या चेहऱ्यावरचे नेहमीचे निरागस भाव पार पुसले गेलेले आढळतात. आता हे फराहने योग्य केले की अयोग्य हा वादाचा मुद्दा असला तरीही इतर कुणालाही साध्य न होऊ शकलेली गोष्ट तिने सहज करून दाखविली हे मान्य करावेच लागते.

इतक्या आघाड्या सांभाळणारी ही बुद्धिमान महिला अपवादात्मक असली तरी इतर अपवादात्मक महिलांप्रमाणे हिचे व्यक्तिमत्त्व विद्वत्तेच्या ओझ्याखाली धीरगंभीर बनले आहे असे मात्र अजिबात नाही. अतिशय हसतमुख व विनोदी व्यक्तिमत्त्वाची ही महिला डान्स इंडिया डान्स, जो जीता वही सुपरस्टार, एंटरटेन्मेंट के लिए कुछ भी करेगा या व अशा इतर कार्यक्रमांतून प्रेक्षकांसमोर येते, स्पर्धकांशी दिलखुलास संवाद (तेही अगदी थेट बंबईय्या हिंदीतून) साधते तेव्हा कुणी सेलिब्रेटी न वाटता आपल्यातीलच एक सामान्य व्यक्ती वाटते.

व्यक्तिगत आयुष्यात देखील या महिलेने अनेक परंपरांना छेद दिला आहे. सहसा महिला आपला वैवाहिक जोडीदार शोधताना वय व शारीरिक क्षमता यांत आपल्यापेक्षा वरचढ पुरुषास पसंती देतात. तसेच मुस्लिम महिला सहसा गैर मुस्लिम पुरुषांना पसंती देत नाहीत. परंतु इथेही सर्व परंपरांना छेद देत फराहने आपल्यापेक्षा तब्बल साडेआठ वर्षांनी लहान असलेल्या शिरीष कुंदेर सोबत विवाह केला. चाळिशीनंतर मातृत्व टाळण्याकडे महिलांचा कल असतो. इथेही पुन्हा अपवाद करीत फराहने वयाच्या त्रेचाळिसाव्या वर्षी ही संधी घेतली आणि निसर्गानेही तिला अपवादांची मालिका प्रवाहित ठेवण्यास साहाय्य करीत एक पुत्र (झार) व दोन कन्या (दिवा आणि अन्या) या तिळ्यांची आई बनविले.


फराहचे विशेष कौतुक करावेसे वाटते ते तिच्या द्रष्टेपणा बाबत. द्रष्टेपण म्हणजे भविष्याचा वेध घेण्याची कला. हे भल्याभल्यांना जमत नाही. पुरुषांत देखील हा गुण अपवादानेच आढळतो तिथे स्त्रियांची काय कथा? मनोरंजन क्षेत्रात पूर्वी एखाद्या बड्या असामीने एखादा चित्रपट बनविला आणि तो प्रेक्षकांनी स्वीकारला नाही की लगेच आम्ही काळाच्या पुढचा चित्रपट बनविला असे म्हटले जायचे. देव आनंद यांचा तर हा अतिशय प्रसिद्ध युक्तिवाद होता. अर्थात त्यांचे मै सोलह बरस की, सेन्सॉर आणि मिस्टर प्राईम मिनिस्टर हे चित्रपट पाहताना हा युक्तिवाद माफक प्रमाणात पटतो देखील. परंतु यश चोप्रांनी जेव्हा त्यांचा लम्हे हा चित्रपट अपयशी ठरला आणि तो काळाच्या पुढचा असल्याचा दावा केला तेव्हा त्यात काही तथ्य नव्हते कारण याच कथेवर पूर्वी गुलजार यांनी मौसम हा एक यशस्वी चित्रपट बनवून दाखविला होता. असो. तर असे हे द्रष्टेपण समाजात अभावानेच आढळणारे. फराह

खान मध्ये ही भविष्याचा वेध घेणारी कला दिसून आली ती २००९ मध्ये जेव्हा तिने तेरे मेरे बीच में नावाचा एक सेलिब्रिटी रिअलिटी शो स्टार प्लस या उपग्रह वाहिनीवर सादर केला. तेरा भागांच्या कार्यक्रमाला फारसा प्रतिसाद लाभला नाही कारण तेव्हा ही संकल्पना नवीन होती. आता मात्र अशी संकल्पना रुळली आहे. अनुपम खेर देखील असा एक कार्यक्रम आता सादर करतात आणि त्याला चांगला प्रतिसाद देखील मिळतोय. तर फराह च्या कार्यक्रमात तिने दुसऱ्याच भागात मुष्टीयोद्धा विजेंद्र सिंग आणि अभिनेत्री प्रियांका चोप्रा यांना निमंत्रित केले होते. त्यात तिने विजेंद्रला अभिनय करण्याविषयी सुचविले होते आणि त्याच्याकडून लहानसा प्रसंग सादरही करून घेतला होता. त्याचप्रमाणे प्रियांकालाही तिने लुटुपुटूचे बॉक्सिंग करायला लावले होते. गंमत म्हणजे विजेंद्र सिंग फग्ली या चित्रपटाद्वारे अभिनेता म्हणून प्रेक्षकांपुढे आलाय आणि प्रियंकानेही मेरी कोम वरील चित्रपटात प्रशंसनीय बॉक्सिंग केली आहे. ह्या भविष्याचा पाच वर्षांपूर्वीच वेध घेणाऱ्या ह्या महिलेला द्रष्टेपण नाही असे म्हणावे तरी कसे? विकिपीडियावरील माहितीनुसार फराह खानचा जन्म ९ जानेवारी १९६५ चा म्हणजे चित्रपटसृष्टीतील तीनही दिग्गज खानांपेक्षा ती वयाने जराशी मोठीच. तिच्याच वयाच्या असलेल्या पद्मिनी कोल्हापुरे आणि रेणुका शहाणे या आणि अशा इतर अनेकींची कारकीर्द आता जवळपास संपुष्टात आलेली असताना वयाचं अर्धशतक + अर्धदशक पार करत असलेली ही महिला मनोरंजन क्षेत्रात अनेक आघाड्यांवर एकाच वेळी यशस्वीपणे कार्यरत राहू पाहत आहे. या निमित्ताने तिच्या भावी वाटचालीकरिता शुभेच्छा देऊन ह्या लेखाची सांगता करतो.



**शब्दांश सादर करत आहे ...** **माझ्यातली 'ती'- स्त्री विशेष अंक**

पंडिता रमाबाई लक्ष्मीबाई टिळक रमाबाई रानडे आनंदीबाई कर्वे राणी लक्ष्मीबाई



*" तिच्या मनाची घालमेल एका अंकामध्ये मांडने खरं तर शक्य नाही.*
*तिची नानाविध रुपे, हजारो रंगछटा आणि अनेक भाव-भावना,*
*कधी व्यक्त... कधी अव्यक्त, तर कधी मुक्त आणि कधी बंदिस्त,*
*त्याच ' माझ्यातल्या ती ' ला तिच्याच जागतिक महिला दिना निमीत्त, एक छोटीशी भेट...*
*म्हणजे आम्हा सगळ्यांचा हा छोटासा प्रयत्न."*
*हा पहिला-वहिला स्त्रि-विषेश अंक आपणास सादर करत आहोत...माझ्यातली 'ती'*

(सिध्दि चव्हाण- siddhic.blogspot.com/siddhic1991@gmail.com)

*“गुंफून मोती साहित्याचे*
*सरस्वती ती सजते आहे*
*मनात माझ्या भावफुलांची*
*एक कळी बघ खुलते आहे.*

*क्षणात रचितो क्षणात पडतो*
*अल्पमतीचा ललित मनोरा*
*कृपाछत्र तव धर डोक्यावर*
*स्त्रीचा जागर करू साजरा...”*

(मधुरा कुलकर्णी)

*“प्रत्येकाच्या मनातच 'ती' आहे... अवखळ तर कधी रणरागिणी,*
*कधी मनमोकळी तर कधी गूढ,*
*कधी मनस्वी तर कधी वेंधळी,*
*तिलाच कागदावर मांडायचा एक छोटा प्रयत्न...*
*आणि तोच तुमच्या समोर सादर करतो आहे...माझ्यातली 'ती' मधून.”*

(अर्चना गवस/चौधरी - archanagawas20079@gmail.com\Www.facebook.com/rangmantle)

शब्दांश सादर करत आहे ...

माझ्यातली 'ती' - स्त्री विशेष अंक

*ती इथेच असते.. आपल्यात.*
*अंतरंगातून अलगद डोकवणारी...*
*माया, वात्सल्य अशा अनेक भावना जपणारी..*
*चुका पदरात घेणारी आणि प्रसंग आलाच तर*
*तोच पदर खोचून लढणारी..*
*ती इथेच असते आपल्यात..*

*विशेष भावना जपणारी..*
*काही जाणिवा साठवणारी..*
*आपल्या अस्तित्वाने जग बदलणारी..*
*ती म्हणजे "स्त्री"*
*तुझ्यात असते, माझ्यात असते*
*आणि बहरतेच ना आपल्या अवतीभोवती..*

*माझ्यातली "ती"*

(अजय चव्हाण - ajayrchavan90gmail.com)



***माझ्यातली 'ती' - स्त्री विशेष अंक-२०२०***

आपल्या प्रतिक्रियांच्या प्रतिक्षेत - shabdaunsh@gmail.com /facebookalwayson@gmail.com

*लिखाणाचे सर्व हक्क संयोजक मंडळाच्या स्वाधीन आहेत.*